किरकोळ अंकास ........................ ६४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस......... ६१ ०६

दुसरे खेपेस .... ....... ६१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Six monthly......... 3 ................ 8 as

Single copy ................................ 4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ...... 4 as

Repetition Per line... 3 as

AOL XXXII — AKOLA MONDAY 5 SEPTEMBER 1898 — NO 35

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख ५ माहे सप्टेंबर सन १८९८ इ० — अंक ३५

### NOTICE

Notice under section 150 (1) of the Berar Municipal Law of 1886.

Notice is hereby given to the general public, that the Municipal Committee of Akote, have in their special meeting convened on the 20th August 1898, proposed the following rules under section 116 (1) (e) and [g] and (2) of the Law for the inspection and proper regulation of vegetable and meat markets and slaughter houses and for controlling and regulating the use and management of the burial and burning grounds situated within the limits of the said Municipality.

Any one objecting to the proposed rules, may within thirty days from the date of this notice, submit his objections if any in writing to the undersigned.

Dated Akote 20th August 1898 — V. A. Kane, Chairman Municipal Committee Akote.

### RULES FOR MEAT MARKET

1. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, from time to time, appoint a place or places to be used as a meat market or meat markets.

2. A meat market may be used for exposing for sale the following articles only:—

(a) Animal flesh intended as a human food.

(b) Fish, fresh or dried.

Nothing not intended for sale shall be admitted to the market.

3. Sites within a market will be allotted to vendors within which they must keep their shops, and no Chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee.

4. Meat market may be open daily from 4 o'clock A. M. to 9 O'clock P. M. and shall be closed at the latter hour.

5. Lepers, beggers, and persons who misconduct themselves may be ejected from a meat market, by any Municipal officer or servant.

6. Any article exposed for sale pronounced by the Civil Surgeon Akola or by Medical Officer in charge of the Charitable Dispensary Akote, to be unfit for human consumption, shall be seized, and may under the direction of a Municipal officer be destroyed or otherwise disposed of.

7. Every meat market shall be under the management and supervision of the Municipal officer appointed by the Municipal Committee for the purpose, and such person shall be primarily responsible for the sanitation of such markets, and for the due observance within them of these rules.

### VEGETABLE MARKET

1. The Municipal Committee may with the sanction of the Deputy Commissioner appoint a place or places to be used as a vegetable, fruit, and flower market or markets.

2 The vegetable market shall be used only for exposing for sale the following articles:—

(a) Vegetables, fresh or dried.

(b) Fruits and roots, fresh or dried.

(c) Plantain and other leaves.

(d) Flowers.

Nothing not intended for sale shall be admitted to the market.

3. Sites within the market will be allotted to vendors within which they must keep their shops, and no chabutra or building shall be erected without the sanction of the Municipal Committee.

4. A vegetable market may be open daily from 4 o'clock A. M. to 9 o'clock P. M. and shall be closed at the latter hour.

5. Lepers, baggers, and persons who misconduct themselves may be ejected from the vegetable market by any Municipal officer or servant.

6. Any article exposed for sale pronounced by the Civil Surgeon of the District or by the Medical officer in charge of the local Charitable Dispensary, to be unfit for human consumption shall be seized and may under the direction of a Municipal officer be destroyed or otherwise disposed of.

7. Every vegetable market shall be under the management and supervision of the Municipal officer appointed by the Municipal Committee, for the purpose and such person shall be primarily responsible for the sanitation of such markets and for due observance within them of these rules.

### BURIAL AND BURNING GROUNDS

1. The Municipal Committee may, with the sanction of the Deputy Commissioner, from time to time, fix a site or sites for public burial and burning grounds.

2 Except by special permission of the Municipal Committee, no person shall bury or burn a human body elsewhere than in ground set apart for such purposes.

3 Every body buried must be completely covered with earth to a depth of not less than six feet from the surface of the ground or, if burnt, completely reduced to ashes.

4. The erection of a tomb or monument within the area of a public burning or burying ground is forbidden except with the previous permission of the Municipality.

5 Every burial and burning ground shall be under the management and supervision of the Municipal officer appointed by the Municipal Committee for the purpose and such person shall be primarily responsible for the sanitation of such burial and burning grounds, and for the due observance within them of these rules.

### SLAUGHTER HOUSES

1 Every slaughter-house etablished at a place fixed by the Municipal Committee under section 89 of the Berar Municipal Law, shall have outer and inner yard, and shall be cleansed in accordance with such orders as may from time to time be issued by the Municipal Committee.

2. All cattle, sheep, and goats intended for sale for human consumption within Municipal limits, shall be brought to the outer yard of the slaughter house at the hours appointed by the Municipal Committee and presented for inspection.

3. An officer appointed or authorized by the Municipal Committee, shall inspect every animal brought for slaughter, and shall reject any animal that may appear to him unfit for human consumption. Every animal so rejected shall be forth-with removed by the owner from the slaugter-house permises. Every animal passed by the inspector shall be marked and removed to the inner yard of the slaughter house for slaughter after payment, if the slaughter house belongs to the Committee, of the prescribed fees, but no meat shall be sold or exposed for sale at the slaughter house.

4. The slaughter house shall be open every day during such hours as the Municipal Committee may, from time to time, fix, and if the slaughter-house belongs to the committee a person appointed or authorized by the Municipal Committee shall remain during these hours at the slaughter-house for the issue of receipts for fees, which shall be in form appended.

Form referred to in rule 4

Received from ______ the sum of Rs. ______ being fees for slaughtering ______ which has / have been passed by the inspecting officer as fit for human consumption.

Dated ______ 189

Secretary Municipality

### PENALTIES

Any person who infringes any of the above rules, or who in contravention of the rules framed for the regulation of slaughter houses shall be found in possession within the inner yard of the slaughter house of any animal which has not been duly passed and marked shall, on conviction before a Magistrate, be punishable with fine which may extend to Rupees fifty.

Dated Akote 20th August 1898 — V. A. Kane, Chairman Municipal Committee Akote.

### NOTICE

Tenders are invited for the contracts for the manufacture and supply of country spirit in the areas mentioned below of the Hyderabad Assigned Districts from the 1st April 1899:—

2. Tenders may be made for—

(a) the monopoly of manufacture and sale under the Bombay minimum guarantee system now in force in the said areas; or

(b) the manufacture and monopoly of supply to retail vendors under the Madras contract distillery system.

3. The duration of any contract will be fixed at the discretion and under the orders of the Resident at Hyderabad. Full particulars of the other conditions under which tenders may be made, and under which the contracts will be granted, can be obtained on application to the Inspector-General of Excise, Hyderabad Assigned Districts, Amraoti Camp.

4. No tenders will be received after noon on the fifteenth day of October 1898.

5. The contract areas are as follows:—

(a) Ellichpur Distillery area.

Ellichpur District.—2,623 square miles with a population at the last census of 315,798.

Amraoti District —2,759 square miles; population 655,645.

Note—As regards this area, tenderers may offer for the contract under either or both systems for the Ellichpur district alone, or for the Amraoti district alone, or for the whole of the Ellichpur distillery area, which includes both the Ellichpur and the Amraoti Districts.

(b) Akola Distillery area.

Akola District.—2,659 square miles; population 574,782.

Malkapur Taluk (of the Buldana District).—791 square miles; population 177,877.

W. HASTINGS, MAJOR,
*Inspector-General of Excise,*
*Hyderabad Assigned Districts.*

---

## रा. शेवडेकृत अहल्या चरित काव्य.

(आमच्या एका मित्राकडून) नंबर ३

हें परीक्षण चालू असतां मध्येंच एका आक्षेपकानें आह्मावर उचल खाली व त्यांचें तें वादांग पुरें होई पर्यंत आह्मास मध्यंतरींच खुंटून बसावें लागलें. या आक्षेपकाचे विचार किती अप्रयुक्त व भ्रांतिमूलक आहेत व त्यानें वस्तुस्थिति छपविण्याचा प्रयत्न करून शेवटीं आपलें धोंगडें आपल्याच गळ्यांत कसें अडकवून घेतलें आहे याचें सविस्तर स्पष्टीकरण चालू टीकेच्या उपसंहारांत केलें आहे त्यावरून वाचकांचे ध्यांनीं येईल. चालू टीका पूर्ण होऊं न देतां मध्यंतरींच एवढ्या उतावळीनें हीं प्रसिद्ध जाहलेलीं पत्रें कोणते दिशेकडून वाहात आलीं असावीं याची कल्पना वाचकास होईलच. असो.

मागील अंकांत ज्या तीन चरणांत छंदोभंग जाहला ह्मणोन ह्मटलें आहे त्यांतील "किंवा" या शद्बाचा "[illegible]र बोलण्यांत जसा उच्चार [illegible] करावा"

ह्मणोन कवीनें वाचकास विनंती केली आहे. कवीचे हेतू प्रमाणें उच्चार सफाईदार केल्यानें ही 'गणांत' बदल होऊं शकत नाहीं व त्यामुळें कवीवर छंदभंग केल्याचा आरोप सिद्ध होतो. गेल्या ता० ८ आगस्टच्या अंकांत छंदभंगा विषयीं उदाहरणें दिलींच आहेत.

(९) सहृदयत्व. कोणतेंही काव्य रचतांना त्यांत व्याकरण, शद्वशुद्धता व छंद एवढ्यां गोष्टीकडेसच लक्ष्य पोंहचाविलें ह्मणजे तें काव्य उत्तम झालें असें नाहीं. त्यांत सहृदयत्व हाही एक विशेष गुण असावा लागतो व तो कवींचे अंगीं स्वभावजन्य असला पाहिजे. ह्मणजे कवीस हृदयाच्या शृंगारवीर करुणादि ज्या नानाविध वृत्ति त्या अत्यंत सूक्ष्मत्वानें व स्पष्टत्वानें भासल्या पाहिजेत. वर्डस्वर्थ नामक इंग्रजी कवीनें देखील अशाच अर्थाचें ह्मणजे Poetry is the spontaneous overflow of powerful feelings) असें कवित्वाचें लक्षण केलें आहे. हें लक्षण ज्याच्या ठायीं वसत नाहीं त्याची बुद्धि कितीही प्रचंड असली तरी ती त्यास कवित्वाचे ठिकाणीं अगदीं कामास पडावयाची नाहीं. तुकाराम,. मोरोपंत, वामन पंडित, इत्यादि महा कवींचीं कवनें लोकांस एवढीं प्रिय होण्याचें कारण हेंच आहे. पदलालित्य छंद, व्याकरण यांची शुद्धता वगैरे गुण काव्यास शोभादायक व आवश्यक खरे; तथापि ते एक्या अर्थानें गौणच होत. कारण हे सामान्य बुद्धीच्या मनुष्यासही साधण्यासारखे आहेत. तसा वरील गुण नव्हे. काव्याचे ठिकाणीं वरील गुणाची मातब्बरी केवढी आहे हें शेक्सपीअर नामक इंग्रजी कवीचे उदाहरणावरून चांगलें व्यक्त होतें. इंग्लिश लोकांच्या अभिमानाचें परमस्थान होऊन बसलेला जो हा कवि याचे काव्यांत अमुक जातीचे दोषास थारा नाहीं असें तर प्रायः आढळतच नाहीं. त्याचे काव्यांतील व्याकरण दोषांचे फार प्रसिद्ध उदाहरण ह्मणजे ज्युलिअस सीझर नाटकांतील There is tears for his love हें वाक्य होय. यांत क्रियापद एकवचनी असून कर्ता बहुवचनी आहे! यावरून व्याकरण शुद्धता वगैरे गुण हे काव्यपरीक्षेचें केवळ मुख्यांग नसून सहृदयत्वच हें मुख्य होय हें वाचकांचे ध्यानीं येईल. साधारण वस्त्रालंकार परिधान केलेल्या रूपवान स्त्रीकडेस, पाहणाराचें मन ज्या प्रमाणें तिचे वस्त्रांतील छिद्राकडेस अथवा तिचे अंगावरील एखाद्या मोडक्या डागिण्याकडेस न जातां तिच्या सौंदर्याकडेस वेधतें तसेंच काव्याचें आहे. आपल्या प्राचीन व आधुनिक कवींत जो मोठा भेद आहे तो हाच. हल्लींचे काळीं कीर्तीच्या किंवा पैशाच्या लोभास्तव कविता करणें हा एक नसा धंदाच झाला आहे तसें पूर्वीच्या काळीं नव्हतें. पूर्वीचे कवि स्वानुभूत गोष्टींचें व मनोवृत्तींचें वर्णन करीत. हल्लीं कविता करणें हा एक नसा धंदाच झाला असल्यामुळें स्वानुभव हा कवीस नकोसाच झाला. त्या योगानें कवितेस सहृदयत्वा पेक्षां बुद्धीची व मेहनतीचीच विशेष गरज लागूं लागली व कविता करणें ह्मणजे सामान्य व्यवहारांतील एखादे कलम प्रमाणें गण मात्रा जुळण्याचेंच एक काम होऊन बसलें. अशा परंपरेनें काव्यांतील प्रधान गुणाचा लोप होऊन ढोंगी काव्यांचें प्राबल्य वाढलें. हल्लीं या कृत्रिम काव्यांची एथ पावेतों मजल येऊन ठेपली आहे कीं आमचे आधुनिक कवीस वरील खऱ्या अर्थाचा विसर पडून त्यांस काव्यांचा बाह्य वेष ह्मणजे छंद, मृदु रचना वगैरे हीं छानछोक करण्यांतच कवित्वाचें सर्वस्व येऊन बसलें आहे असें वाटूं लागलें आहे. विद्वत्तेचे जोरावर असें बाह्य वेषानें विभूषित केलेलें काव्य अर्थातच लोकांस मनोरंजक होत नाहीं व त्यामुळें लोक त्यास नाक डोळे मुरडूं लागतात. हें कित्येक आधुनिक महत्वाकांक्षी कवींस खपत नाहीं. तें आपलें व्यंग दूर करण्याची खटपट न करितां उलट लोकांची त्यांस चीड येते. मग ते लोकांस अभिरुचीच नाहीं, जुनें कवीच भ्रष्ट वगैरे शिव्या देण्यास व हातपाय आपटण्यास आरंभ करतात. जी स्त्री मूळांतच कुरूप आहे तीस कितीही उत्तम अथवा साध्या अलंकारांनीं विभूषित केली तथापि तिचें मूल सौंदर्यांत बदल होत नाहीं. हें तत्व वरील शहाण्यांचे लक्ष्यांत येत नाहीं. तसेंच विद्वत्तेशी कवित्वाचा अर्थाअर्थी संबंध नाहीं हेंही त्यांचे डोक्यांत शिरत नाहीं. सौंदर्य, उत्तम स्वर व कवित्व ह्या नैसर्गिक ईश्वरी देणग्या होत. ज्यास गळा नाहीं असा एखादा पण्डित आपला गर्दभी सूर मोठ्या तालांत झोकोंन काढून गाऊं लागला असतां ऐकणारास हसूं आल्या बद्दल जर रागावूं लागला व तुह्मास गायन शास्त्र कळत नाहीं ह्मणोन प्रतिपादन करूं लागला तर हें त्याचें कृत्य जितकें समंजसपणाचें होईल तितकेंच दांडगाईनें कवि होऊं पाहणाराचें आहे. वायफळ शद्व पाण्डित्य करणाऱ्या अशा कवी संबंधानें भवभूतीनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे.

हठादाकृष्टानां कतिपय पदानां रचयिता ।
जनः स्पर्द्धालुश्चेदहह कविना वश्यवचसा ।
भवेदद्यश्वोवा किमिह बहुना पापिनि कलौ ।
घटानां निर्मातु स्त्रिभुवन विधातुश्च कलहः ।

भवभूति

"ओढून ताणून शद्बांची जुळवाजुळव करणारा मनुष्य सरस्वती ज्यास प्रसन्न आहे अशा महा कवीशी जर स्पर्धा करूं लागला तर आज उद्यां मडकी घडणाऱ्या कुंभाराचा व त्रिभुवनास ज्यानें निर्माण केलें त्या ब्रह्मदेवाचा ही कलह लागेल!! कोणी सांगावें!"

असो, यावरून ज्या काव्यांत सहृदयता हा गुण नाहीं तें काव्य वाचकास अगदीं नीरस व रुक्ष वाटणें साहजिकच आहे. तें वाचल्या पासून अगर ऐकल्या पासून मनाची प्रसन्नता न होता उलट मन खिन्न व उदास होतें. रा. शेवडे यांचें प्रस्तुत काव्य अशाच मासल्याचें आहे. या काव्यांतील २५० पद्यें लक्ष्यपूर्वक वाचून पाहिलीं ह्मणजे रा. शेवडे यांनीं आपणावरील अडिचशें संकटेंच टाळलीं असा भास होतो! या काव्यांतील मोठा गुण ह्मटला ह्मणजे कवितेच्या पहिल्या चरणाचे शेवटील यमक दुसऱ्यांत शद्बाचें वाटेल तसें वाकडें तिकडें रूप करून अथवा पाहिजे तसा अर्थ घेऊन साधणें हा होय! वास्तविकपणें पाहतां प्रस्तुत काव्यांत रा. शेवडे यांस आपली वर्णनशक्ति, आपले उदात्त विचार, व आपली सहृदयता हीं प्रगट करण्यास पदोपदीं स्थळें होतीं परंतु दुर्दैवानें त्यांजकडून एकही प्रसंग साजरा करवला गेला नाहीं. उलट आरंभापासून शेवटपर्यंत पुस्तक लक्ष्यपूर्वक वाचलें असतां मन आल्हादित न होतां खिन्न मात्र होतें. आमचे कवीस सहृदयतेची कशी ओळख नाहीं हें खालील उदाहरणावरून कळेल.

कविता ४२ पहिल्या दोन ओळी पाहा.

कधीं सुरस अन्न खा कधिंच भात खा कोरडा।
कलत्र तनयां सवें कधीं वसा हसा कीं रडा॥

वरील कवितेंत या जगांत मनुष्यास विपत्ति प्राप्त झाली असतां त्यास केव्हां "कोरडा भात ही [ कोरडी भाकर देखील नव्हे! ] " खाण्याचा प्रसंग येतो ह्मणोन कवीनें वर्णिलें आहे! मनुष्य विपत्तींत असला ह्मणजे त्यास भात मिळण्याची पंचाईत पडते कीं कोरडी भाकर देखील मिळण्याची पंचाईत पडते हें कवीस कळेल तर! आमचे कवीस दुष्काळग्रस्त झालेले लोकांस खावयास मिळत नाहीं तर "घी खिचडी खावी" ह्मणून उपदेश करणोर प्रति नबाब ह्मटलें असतां शोभेल! हाच अर्थ निराळे रूपानें वामन पंडितांनीं आपले स्फूट श्लोकांत कसा वर्णिला आहे पाहा.

महीपृष्ठीं केव्हां अवचट पलंगीं पहुडतो।
क्षुधेतें शाकान्नें अवचट सदन्नें निवटितो॥
कधीं कंथाधारी अवचट सुवस्त्रें मिरवितो।
मनस्वी कार्यार्थी किमपि सुखदुःखें न गणितो॥

वामन.

कविता १९९ शेवटील दोन ओळी.

नकोचि करूं संचया ह्मणुनि सांगती ज्ञानि ते।
रुचे वचन परी अतिदितार्थ अज्ञानि ते॥

वरील कवितेंत जे लोक धनाचा संचय करतात ते स्वतःस फसवून घेतात ह्मणोन वर्णिलें आहे. कारण आमच्या कवीच्या मतें एक तर लोकांनीं संचित केलेलें धन खाऊन फस्त करावें किंवा भिकाऱ्यास वांटून टाकावें, जवळ द्रव्य असलें ह्मणजे संभाळण्याचा कोण ताप! [ १९७ कविता पाहा ] यास्त "नकोचि करूं संचया" ह्मणजे धनसंचय करण्याचे नादींच पडूं नका ह्मणून कवीनें वरील पद्यांत आग्रह पूर्वक लोकांस उपदेश केला आहे! आमचे कवीवर लक्ष्मीचे वंघूची तर छाया पडली नाहीं ना!

असो. वरील उदाहणावरून आमचे कवीस स्वानुभव अथवा सहृदयत्व किती आहे हें समजेल. याप्रमाणेंच प्रस्तुत काव्यांत रसभंग झाल्याचीं, शद्बांस विद्रूप केल्याचीं व साकांक्षत्व, संकीर्णत्व वगैरे अनेक जातीच्या काव्य दोषाचीं इतकीं भरपूर उदाहरणें आहेत कीं त्या सर्वांचे सविस्तर निरूपण करूं लागल्यास एक स्वतंत्र निराळा ग्रंथच करावा लागेल. या सर्व विवेचनावरून प्रस्तुत पद्यात्मक चरित्र 'काव्य' या संज्ञेस सर्वथैव अयोग्य आहे हेंहि वाचकांचे ध्यानीं येईलच. असो.

पुढें चालू.

---

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ९ शके १८२०

---

मोहाच्या दारूचा मक्ता १८९९ च्या १ ले एप्रिल पासून सरकाराला लिलावानें द्यावयाचा आहे. हा लिलांव लेखी टेंडरांनीं येत्या आक्टोबरच्या १५ वे तारखेला होईल आणि त्या टेंडरांचा निकाल अलिशान रेसिडेंट साहेबांच्या मंजुरातीनें पक्का होईल. हा मक्ता सर्व प्रांतासाठीं नसून सरकारी भट्टी संबंधाचा आहे. इनस्पेक्टर जनरल यांनीं या बाबदींत इंग्रजीत जाहिरात प्रसिद्ध केली आहे आणि मक्ता घेऊं इच्छिणाऱ्या मंडळीस आमचे डिपुटी कमिशनर मे. मीडो साहेब या विषयाची माहिती आकोल्यास सांगणार आहेत. हा दारूचा मक्ता नवीन तऱ्हेचा आहे. जुन्या कलाली मक्तेदारास याची चांगलीशी माहिती नसते ह्मणून तत्संबंधी कांहीं ठळक ठळक गोष्टी आह्मी खालीं देतों.

वऱ्हाडांत दोन सरकारी भट्ट्या आहेत. पहिली भट्टी इलिचपुरास बांधली असून दुसरी आकोल्यास बांधण्यांत आली. या भट्ट्यांचे कारखानें मोठे आहेत आणि त्यांत मोहाच्या फुलची दारू अस्सल प्रतीची उतरतात. दोघा पार्शी गृहस्थांनीं या भट्ट्या चालविल्या. त्यांच्या मक्त्यांची मुदत पुढील सालीं मार्च ३१ वीला संपते नवीन मक्ते तीन वर्षां पेक्षां अधीक मुदतीनें दिले जाणार नाहींत. पक्की मुदत रेसिडेंट साहेब ठरवितील. ज्यांस मक्ता घ्यावयाचा असेल त्यांनीं आपापल्या टेंडराबरोबर पांचशे रुपये अमानत ठेविले पाहिजेत.

इलिचपूरच्या भट्टीच्या इलाख्यांत इलिचपूर व उमरावती असे दोन जिल्हे येतात; आणि आकोल्याच्या भट्टीच्या इलाख्यांत आकोला जिल्हा व मलकापूर तालुका असे दोन भाग येतात. सरकारी भट्टीचें क्षेत्रफळ, लोकवस्ती व दारूचीं दुकानें यांचा तपशील येणें प्रमाणें:—

| | लोकसंख्या | दुकानें |
|---|---|---|
| इलिचपूर जिल्हा | ३१५७९८ | १९९ |
| उमरावती ,, | ६९९६४५ | २६९ |
| आकोला ,, | ५७४७८२ | १२९ |
| मलकापूर ता. | १७७८७७ | ६४ |

सरकारी भट्टीच्या इमारतीबद्दल ठरीव भाडे ह्मणजे सुमारें दरमहा १०० रुपये पडतील. त्या भट्टींतून दोन प्रकारची दारू उतरावयाची असते. त्यांची तलखी यंत्रानें निर्णीत केलेली आहे बेवडा किंवा अर्क २५ पुफचा असतो आणि राशी दारू ६० प्रफाची असते. मक्त्यांचीं वेंडरें दोन तऱ्हेचीं द्यावयाचीं आहेत. मुंबईची तऱ्हा हल्लीं सरकारी भट्टीवर चालूं आहे आणि दुसरी तऱ्हा मद्रासची होय. मुंबईच्या पद्धती प्रमाणें मक्तेदारानें दारू तयार करावी व नमलेल्या दुकानीं नेमक्या दरानें विकावी. मक्तेदार सरकाराला कबूल करितो कीं दर ग्यालना मागें बेवड्याला २ रुपये व राशीला १ रुपया या प्रमाणें जितकी ग्यालन दारू सरकारी भट्टींतून विकली जाईल तितक्या ग्यालनावर सरकारी कर मी देईन इतकेंच नाहीं तर दारू कितीहि कमी खपली तरी सरकारला अमूक एका ठरीव रकमेबद्दल हम्मी देतो. दारू पुष्कळशी खपली तर सरकारी कराची आकारणी ठरीव रकमे पेक्षां जास्तच होते परंतु खप कमी झाला झाला ह्मणजे कराची रकम कमी

वसूल होते आणि मक्तेदाराला आपपल्या पदरून सरकारची रक्कम पुरी करून द्यावी लागते. मद्रास पद्धती मध्यें मक्तेदाराला ठरीव दरानें दारूचा पुरवठा करावा लागतो. निरनिराळया दुकानांत दारू विकण्याची फी घेऊन सरकार इतर लोकांस परवाना देते. या परवानेवाल्यांनीं मक्तेदारांकडूनच दारू घेतली पाहिजे आणि ती दारू विकत घेतांना त्यांनीं सरकारी भट्टीचा दर ग्यालनी कर व दर ग्यालनाची मक्तेदाराची किंमत असा एकूण महसूल चुकविला पाहिजे. मुंबईच्या रीतीनें मक्तेदार सरकारचें सालिना उत्पन्न किमानपक्षाचें ठरवून देतो; त्या पेक्षां अधीक भट्टीचा कर वसूल झाला तर सरकारला व मक्तेदाराला उभयपक्षीं फायदा होतो. जो अधीक रक्कम देईल त्यालाच सरकारी मक्ता मिळेल. मद्रासच्या रीतीनें मक्तेदाराला दारूचा खजिनदार बनून दर ग्यालनाला अमूक किंमतीनें दारू पुरवीन असा करार करावयाचा असतो. अर्थात जो कमी किंमतीनें दारूचा पुरवठा परवानेवाल्या दुकानदारास करील त्यास सरकार दारू उतरण्याचा मक्ता देईल. या मक्त्यांत परवानेवाले दुकानदार काय ते मक्तेदाराचीं गिऱ्हाईकें असतात. दुकानदार दारूची किंमत व सरकारी कर अशा दोन्ही बाबी चुकवितात. आणि मुंबईकडील पद्धतींत मक्तेदारच दारू पुरविणारा व दुकानदार असतो. मद्रासच्या पद्धतीनें सरकारी उत्पन्नाला मक्तेदाराच्या उत्पन्ना प्रमाणेंच सारखा धोका असतो. जशी विक्री होते तसें करांचें उत्पन्न होत असतें. परंतु मुंबईच्या पद्धतीनें सरकारचें उत्पन्न मक्तेदारानें कबूल केलेल्या रकमेखालीं निदान उतरत नाहीं. मक्ता कोणत्याही तऱ्हेचा सरकारानें दिला तरी या व्यापारांत मूळ खुबी काय ती दारूच्या खपाचा अंदाज करण्यांत व तितकी दारू तयार करण्याचा खर्च नक्की करण्यांतच आहे. किंबहुना दारू तयार करण्याचा खर्च ही नक्की अनुभवानें ठरवितां येईल. पण मुख्य अनिश्चित बाब म्हणजे मक्त्याच्या वर्षांत दारूचा खप किती होईल याचा अंदाज करणें ही गोष्ट होय. हा अंदाजा बरोबर बिनचूक होण्याला लोकांच्या चालीरिती, मद्य प्राशनाकडे कल, त्यांची गृहस्थिती, भावी पीकपाणी इत्यादि अनेक गोष्टी चांगल्या ठाऊक पाहिजेत ज्या मक्तेदाराचा दारूच्या खपा संबंधानें अंदाजा बरोबर होईल तो हा मक्ता नफ्यानें करूं शकेल. हा अंदाज करितांना गेल्या वर्षी सरकारी भट्टीच्या सरकलांत दारू किती खपली याचे खालील आंकडे चागले उपयोगीं पडतील. गुदस्ताचें वर्ष पीकापाण्या संबंधानेंही बरें गेलें.

| सरकल. जिल्हे. | देवडा ग्यालन. | राशी ग्यालन |
|---|---|---|
| उमरावती. | १२७७६ | १००१८६ |
| आकोला. जि० | १३४६७ | १४००७९ |
| इलिचपूर. जि० | ७६३३ | ६८९७५ |
| मलकापूर. जि० | ३१४२ | ३७७०२ |

आमची स्थानिक सरकारास विनंती आहे कीं मुंबईच्या पद्धती पेक्षां मद्रासची पद्धति चांगली आहे त्या अर्थी दुसऱ्याच प्रकारचे मक्ते वऱ्हाडांत चालू करावे. मुंबईच्या रीतानें दारू अधिकाधिक खपविण्या विषयीं मक्तेदारास सक्तीनें खटपट करावी लागते तसा प्रकार मद्रासच्या रीतीनें होत नाहीं. जितक्या मानानें दारूचा खप होईल त्या मानानें सरकाराला उत्पन्न होईल. आणि मक्तेदारावरही मोठासा बोजा पडणार नाहीं. मद्यपानाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत मिळेल अशी सरकारची रिती असतां कामा नये. अबकारीच्या बाबदींत सरकारची द्रव्यदृष्टी मर्यादित पाहिजे. निव्वळ पैशाकडे नजर दिली म्हणजे लोकांच्या मद्यपानादि व्यसनांस मदत केल्या सारखें होतें. ही अनिष्ट गोष्ट होतां होईल तितकी कमी केली पाहिजे आणि म्हणूनच आम्ही सरकारच्या नजरे पुढें ही गोष्ट मुद्दाम आणिली आहे.

The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 5 1898

We are not moving with the times. It is hard to keep pace with the modern advance of knowledge and sciences. We were once a great people but this does not help us even an inch. On the other hand the fact is a great obstacle in our way in so far as it blinds us to our littleness and insignificance in comparison with the great nations of the world. But there is however a saving element. The fact proves that there are great possibilites of a national awakening and we presume we shall sooner or later rise to the position of a commanding nation *if* we survive the present struggle of an industrial life. The struggle is momentous and it is equally probable that we shall not improve from the shock the contact of the Western nations has produced amongst us. We have been shaken to the very foundations. There is no life preceptible in us that will give us power and strength to regain our own position in the world's market. Our country is sapped of the very juice that makes a nation what it is. Our industrial and manufacturing activities are a dream of the past. It is very recently that we have begun to feel a return to those life—giving influences and if we are to prosper as a part of the British nation. We must make all movements subserve one grand ideal of making India not only a self—supporting nation but one occupying the vast markets of the other nations. We foresee that our salvation lies in the rise of India as a materially prospering and manufacturing nation. All things must converge to push on this ideal of national life before we begin to see its approaching dawn.

There is only one royal road to this goal of our ambition. Our edu—cation must lay the foundations of our future. The present course of education has taught us to know exactly what we want most. Our education is extremely defective in this connection. It is not *practical*. This is the greatest weak point in the whole system. We must throw off all hazy notions and lay it down as a matter of fact that the study of English is not the supreme goal. The English tongue has usurped complete sovereignty and we must prepare ourselves to throw it over-board. Let us under—stand it as a decided fact that the English language is not the medium of education for the general masses. The knowledge and mastery of our mother-tongue is as essential as life. Let all education be administered through it and through no other medium. A matriculate is often a failure when he takes up an English book. He is just at a point whence he can enter with great pain into the real riches of the English literature. A vast number of students play a sorry dance when they face stern realities of life. They are unfit for any useful work except service or prosecution of higher literary, medical, legal or scientific education. They are useless as men of work in the world. They as exponents of the rising generation are the hope of the nations; but they are out-voted at the outset of life as condemned articles. To avert this danger, it is necessary to impart education in the vernaculars, to stop the study of English for an overwhelming number of youths and to provide a course of technical training. Such a system will do India a substantial service and we shall see young men well equipped for the next battle of life. The present course of educaton should be curtailed to a great degree because we people as a whole live a short life and can hardly devote more than twelve years for our education. Even this period is also an extravagant demand upon the time of the young people. We can not sufficiently deprecate the present tendency to run after higher education even when health, means and intellect do not promise a success worth achieving. Life is sacrified towards the mistaken notion of edu—cation. Many hardly complete their long course and find themselves face to face with misery, starvation and social degradation due to want of riches. The total result of our present education is not the commidity wanted in the market of competition. We are put to school for a number of years and find ourselves misplaced at the end when we have to face the difficulties of an Indian life. We require a thorough revision of the present course of instruction. The policy of England towards India is that of a by-stander. The British nation treats India with step-motherly love. This will explain why England has not given India the same institutions of education as she has in England. There is no general education on a solid basis. It needs no mention that technical and com—mercial training being foreign to India is not yet accessible to the general masses of the people. We hope that the new Viceroy who highly appreciates the *practical* phase of education will improve the system of education in important directions.

## वऱ्हाड

हवामान— गेल्या सप्तकांत पाऊस अर्धा पाऊण इंच पडला. अभ्रें येतात, मस्त्री उकडतें इत्यादि चिन्हावरून पाऊस चांगला पडेल असा सुमार आहे. रोगराई कांहीं नाहीं. मुंबईच्या भागाला प्लेगचा उपद्रव वाढ ल्यामुळें मलकापूरच्या क्वारंटाइनचा अंमल कडक झाला आहे.

रा० रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर आफि० ए० असि० कमिशनर यांची नेमणूक मोर्शीसच न होतां वाशिमास झाली व त्या अन्वयें ते गेल्या आठवड्यांत वाशिमास आपल्या नव्या कामीं रुजू झाले.

राव बहादूर सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर हे ६ दिवसांच्या किरकोळ रजेवर नाशिकास व पुण्यास जाण्या साठीं गेल्या गुरुवारीं अकोल्याहून रवाना झाले.

रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एजुकेशनल इनस्पेक्टर हे दोन महिन्याच्या हक्काच्या रजेवर धूळयास गेले आहेत.

रा० रा० गणेश बापुजी उटगीकर ए० असि० कमिशनर यांस वाशिमाहून मलकापुरास बदलल्यामुळें ते गेल्या गुरुवारीं मलकापुरास गेले.

मि० मार्शल सब डिव्हिजनल आफिसर खामगांव हे रजेवर जाणार असून त्यांच्या रजेंत कांहीं दिवस मि० एदलजी संजाना यांनीं अकोल्यास व खामगांवास फेरपाळीनें काम करावें अशी व्यवस्था होणार आहे.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं राव बहादूर वामन नारायण बापट पेनशनर ए० असि० कमिशनर यांस गेल्या २८ वे तारखेला उमरावतीस देवाज्ञा झाली. अलिकडे कांहीं महिने ते बरेच आजारी होते. रावबहादुरांस पेनशन घेऊन पांच वर्षे होतात न होतात तोंच ते मरण पावले. आमच्यांतले सुखवस्तु लोक देखील व्यवहारांतील खटाटोपीनें इतके लवकर झिजतात कीं त्यांच्या अनुभवाच्या परिपक्व दशेच्या आरंभालाच ते मृत्युमुखीं पडतात. गेल्या पिढीची ही दशा! मरण समयीं यांचें वय ५० वर्षे होतें.

राव बहादूर प्रथम शाळाखात्यांत डिपुटी इनस्पेक्टर दोन वर्षे होते. नंतर १८७३ पासून १८८३ पर्यंत चांदुरास तहशीलदार होते. त्यापुढें १८९३ पर्यंत ते एक्स्ट्रा असि कमिशनर होते. हे गृहस्थ हुशार, लोकप्रिय व सरळमार्गी होते. सरकारी कामांत दक्ष, बाणीदार व प्रामाणिक असल्यामुळें सरकारांत त्यांचें वजन मोठें होतें. त्यांचे चिरंजीव राजश्री गोपाळराव हेही अधिकारी असून त्यांच्या सद्गुणावरून लोक त्यांस चांगले चाहतात. ते आपल्या वडिलांची आठवण बुजवितीलच तथापि राव बहादूरांचें प्रेमळ मन, परोपकार, व गोड स्वभाव यामुळें त्यांचे आप्तमित्रास फार दुःख होईल.

### नोटीस.

दरबाऱ्या व अमृता वलद मऱ्या महार राहणार कळंबेश्वर तालुके अकोलें यांस नोटीस देणार हरसिंग वलद दत्ताजी कुणबी राहणार कळंबेश्वर तालुका अकोले नोटीस देतो ऐसाजे कीं तुह्मी आह्मा पासून जुलै सन १८९६ चे अखेर रोख नगदी रुपये १२५ एकशें पंचवीस कर्ज घेतले सदरहू रुपये देण्याविषयीं तुह्मास अनेक वेळ तगादा केला असतां देतो देतो ह्मणून तुह्मी थापा देत आला व रुपये आजपर्यंत दिले नाहींत व्याज पुर्जाही करून दिला नाहीं करितां कळवितो कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत रुपये आणून द्यावे व पावती घ्यावी असे न केल्यास व्याजासह फिर्याद करून सर्व रकम या नोटिशीचें खर्चीसह तुह्मां उभयता पासून दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करण्यांत येईल. कळावे ता० ४।९।९८ इ०

सही.

हरसिंग वलद दत्ताजी पाटील मौजे वर निशानी खुद.

### नोटीस

नोटीस बनाम यासीनखा वल्लद अमीरखा मुसलमान राहणार घाटपुरी परगणे पिंपळगांवराजा तालुके मलकापूर जिल्हा बुलडाणा यांसी नोटीस देणार यासीनबीबींत भिसरीखा राहणार कजबे मलकापूर तालुके मजकूर जिल्हा बुलडाणा. मी तुझी लग्नाची बायको असून तूं मजला नांदवीत नव्हता सबब मी काजीसाहेब मलकापूर व पंचलोकाचे समोर तुजवर फिर्याद केली होती व तूही मलकापूर मुकामीं येऊन चार पंचाचे विचारानें आपसांत सफाई होऊन तूं मजला तारीख २० माहे एप्रील सन १८९८ इसवी रोजीं करारनामा लिहून दिला कीं तुजला मी आज रोजीं घेऊन जात आहें व खावटी बद्दल लेख रसुलभाई याजला करून दिला होता पैसे अदाई करीन व तुजला तीन महिनेपर्यंत चांगले रितीनें वागवीन जर सदरील शर्ती मजकडून घडून आल्या नाहींत तर तलाक आहे.

तुझी तीनही शर्तींचा करार पुरा केला नाही याजवरून मी तुझाला नोटीस लिहून टपाल मार्गे रवाना केली. त्याचेंही तुझी कांहीं उत्तर दिलें नाहीं. करितां मी सदरील पंचलोकापाशीं जाऊन विनंती केली. त्याचे म्हणणें पडलें कीं तुझे नवऱ्यांनीं कांहीं एक शर्त अदा केली नाहीं. याजवरून आतां तुजला धर्मोप्रमाणें मोकळीक झाली आहे जसे तुझे मनास वाटेल तसे कर. याजवरून मी आतां दुसऱ्या मनुष्याशी आपला पाट करण्याची तजवीज करीत आहे. व आतां माझा पाट आठ दाहा दिवसाचे आंत होणार आहे. सबब तुजला या नोटिशीनें कळविलें आहे. या बद्दल तुजला आणखी कांहीं सांगणें असेल तर मलकापूर मुकामीं येऊन नोटीस दिल्या पासून दहा दिवसाचे आंत येऊन सांगावें पुढें तुझी कांहीं तक्रार ऐकली जाणार नाहीं ही नोटीस दिली आहे तारीख २९।८।९८ इसवी दस्तूर छोटे साहेब वल्लद महमद बडे साहेब अर्जनवीस मलकापूर.

सही

यासीन बीबींत मिसरीखा नि० खु०

हातची बांगडी द. छोटेसाहेब.


## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ — G. Watson, ent.


वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम १५० (१) अन्वयें

## जाहिरात

या जाहिरातीनें सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं अकोट म्यु० कमिटीनें ता० २० माहे आगष्ट सन १८९८ इ० रोजीं स्पेशल सभा भरवून सदर्हू म्यु० कमिटीचे हद्दींतील भाजीपाला, फळफळावळ व फुलें वगैरे तसेंच मांस, मच्छी इत्यादि विकण्याचे बाजार आणि जनावरें मारण्याचीं घरें यांची तपासणी व नीट व्यवस्था करण्या करितां आणि प्रेतें पुरण्याच्या व जाळण्याच्या जाग्यांचा उपयोग व बंदोबस्त यांची देखरेख व व्यवस्था करण्या करितां वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम ११६ (१) (इ) व (ग) व (२) अन्वयें खालीं लिहिलेले नियम सुचविले आहेत. सदर्हू नियमाविषयीं ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यांनीं ह्या जाहिरातीचे तारखेपासून ३० दिवसांचे आंत खालीं सही करणारा कडेस लेखी अर्जानें कळवावी. ता० २६ माहे आगष्ट सन १८९८ इ०

V. A. Kane.
चेअरमन
म्यु० क० अकोट

## गोषबाजार.

(१) मे० डि० क० साहेब यांचे मंजुरातीनें म्यु० कमिटीनें वेळोंवेळीं गोषबाजारा करितां एखादी जागा अगर एकीहून ज्यास्त जागा मुकर करावी अथवा कराव्या.

(२) गोष बाजारांत खालीं लिहिलेल्या जिनसा विक्रीसाठीं मांडील्या जाव्या.

(अ) मनुष्यांचे खाण्या करितां उपयोग केला जातो अशा प्रकारचें जनावराचें मांस.

(ब) मासे ताजे अगर सुकलेले. जें कांहीं विकावयाचें नसेल तें बाजारांत ठेवूं दिलें जाणार नाहीं.

(३) बाजारांतील जागा विकणाराला दिल्या जातील व त्या जागेंत त्यांनीं आपलीं दुकानें लाविलीं पाहिजेत. म्यु० कमिटीचे परवानगी शिवाय चबुत्रीं अगर दुसरें कोणतेंही इमारती काम बांधू दिलें जाणार नाहीं.

(४) गोषबाजार दररोज प्रातःकाळचे ४ वाजल्या पासून सायंकाळचे ९ वाजे पावेतों सुरूं राहील व इतर वेळांत बंद राहील.

(५) रक्तपितीवाल्यास, भिकाऱ्यास व गैरवर्तन करणाऱ्यास गोष बाजाराचे बाहेर काढून देण्याचा अधिकार मुकर केलेल्या कोणत्याही म्यु० आफिसरास अथवा नौकरास आहे.

(६) जिल्ह्याचे सि० सर्जन साहेब अगर स्थानिक धर्मार्थ दवाखान्याचे मेडीकल आफिसर यांनीं मनुष्याचे खाण्या करितां जो पदार्थ अयोग्य ठरविला असेल तो पदार्थ जर बाजारांत विक्रीसाठी ठेविला जाईल तर एकदम पकडून म्यु० आफिसराचे हुकुमा वरून त्याचा नाश करण्यांत येईल.

(७) म्यु० क० या कामा करितां ज्या आफिसरास नेमील त्या आफिसराचे देखरेखीखालीं व बंदोबस्ता खालीं प्रत्येक गोषबाजार राहील. आणि अशा बाजारचे सफाई बद्दल व अशा बाजारांत नियम बरोबर अमलांत येतात किंवा नाहींत याबद्दल सदर्हू आफिसरास प्रथम जबाबदार धरिलें जाईल.

## भाजीबाजार.

(१) म्यु० क० नें मे० डेपुटी कमिशनर साहेब यांची मंजुरात मिळवून भाजीपाला, फळफळावळ आणि फुलें विकण्या करितां एखादी जागा अगर एकाहून ज्यास्त जागा मुकर करावी अगर कराव्या.

(२) भाजी बाजारांत खालीं लिहिलेल्या जिनसा विक्री करितां ठेवण्यांत येतील.

( अ ) ताजी अगर सुकलेली भाजी.

( ब ) ताजीं अगर सुकलेलीं फळें व मुळें.

( क ) केळीचीं व इतर पानें.

( ड ) फुलें.

जें विकण्याचा इरादा नसेल तें बाजारांत ठेऊं दिलें जाणार नाहीं.

( ३ ) बाजारांतील जागा विक्री करण्यास दिल्या जातील. व त्या ठिकाणीं त्यांनीं आपलीं दुकानें लाविलीं पाहिजेत. कमिटीच्या मंजुराती शिवाय कोणास चबुत्रा अगर इतर बांधकाम करूं दिलें जाणार नाहीं.

( ४ ) भाजी बाजार दररोज प्रातःकाळचे ४ वाजल्या पासून सायंकाळचे ९ वाजे पावेतों सुरूं राहील व इतर वेळीं बंद राहील.

( ५ ) रक्तपिती वाल्यास, भीकाऱ्यास अथवा गैर वर्तन करणाऱ्यास भाजी बाजारा बाहेर काढून देण्याचा अधिकार मुकरर केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांस अथवा नौकरास आहे.

( ६ ) जिल्ह्याचे सि० सर्जन साहेब अगर स्थानिक धर्मार्थ दवाखान्याचे मेडिकल आफिसर यांनीं जो पदार्थ मनुष्याचे खाण्याकरितां अयोग्य ठरविला असेल तो पदार्थ भाजी बाजारांत विक्रीसाठीं आल्यास तो पकडून म्युनि० कमिटीचे अधिकारी यांचे हुकूमावरून त्याचा नाश केला जाईल अथवा इतर रीतीनें त्याची व्यवस्था करण्यांत येईल.

( ७ ) म्यु० क० ह्या कामा करितां ज्या आफिसरास अधिकार देईल त्या अधिकाऱ्याचे देखरेखी खालीं आणि बंदोबस्ताखालीं प्रत्येक भाजी बाजार राहील व त्या बाजारचे स्वच्छतेबद्दल व त्या बाजारांत वर लिहिलेले नियम योग्य रीतीनें पाळीले जातात किंवा नाहींत याजबद्दल सदर्हू आफिसरास प्रथम जबाबदार समजलें जाईल.

## प्रेतें पुरण्याच्या अगर जाळण्याच्या जागा.

( १ ) म्युनिसिपल कमेटीनें मे० डेपुटी कमिशनर साहेब यांचे मंजुरातीनें सार्वजनिक प्रेतें पुरण्याकरितां अगर जाळण्याकरितां एखादी जागा मुकरर करावी अथवा अनेक जागा मुकरर कराव्या.

( २ ) म्यु० कमिटीची विशेषा परवानगी घेतल्या शिवाय कोणत्याही इसमास मनुष्याचें प्रेत त्यासाठीं जी जागा नेमिली आहे त्या जागे शिवाय इतर ठिकाणीं गाडतां किंवा जाळतां येणार नाहीं.

( ३ ) प्रत्येक प्रेत गाडलें असल्यास जमिनीच्या पृष्ठभागापासून सहा फुटाहून कमी नाहीं इतकें खोल गाडलें जावें व त्यावर माती टाकून पूर्णपणें आच्छादिलें जावें व जाळलें असल्यास त्याची अगदीं राख होई पावेतों जळूं द्यावें.

( ४ ) कमिटीची पूर्वी परवानगी घेतल्या शिवाय सार्वजनिक प्रेतें पुरण्याकरितां व जाळण्याकरितां नेमलेले जागेचे हद्दींत थडगें अगर स्मारक बांधूं दिलें जाणार नाहीं.

( ५ ) प्रत्येक स्मशानभूमि म्यु० क० ह्या कामाकरितां ज्यास नेमील त्या अधिकाऱ्याचे देखरेखी खालीं व बंदोबस्ताखालीं राहील व त्या ठिकाणचे सफाई बद्दल व नियम पालन करण्याबद्दल सदर्हू आफिसरास प्रथम जबाबदार धरिलें जाईल.

## जनावरें मारण्याचीं घरें

( १ ) वऱ्हाड म्यु० कायद्यांतील कलम ८९ अन्वयें म्यु० कमिटीनें ठराविलेले जागीं बांधलेले प्रत्येक स्लाटर हाऊसांत बाहेरचें व आंतील अशीं दोन आंगणें राहतील आणि वेळोंवेळीं ज्याप्रमाणें म्यु० कमिटी हुकूम सोडील त्याप्रमाणें त्यांची सफाई ठेविली जाईल.

( २ ) ज्या जनावरांचें, बकऱ्यांचे अगर मेंढरांचें मांस मनुष्याचें खाण्याकरितां म्यु० कमिटीचे हद्दींत विकलें जातें अशीं सर्व जनावरें म्यु० कमिटीनें ठराविलेले वेळीं तपासण्याकरितां स्लाटर हाऊसचें बाहेरील आंगणांत आणिलीं पाहिजेत.

( ३ ) म्यु० कमिटी ज्यास नेमील अथवा अधिकार देईल त्या कामगारानें स्लाटर हाऊसांत आणलेलें प्रत्येक जनावर तपासावें आणि ज्याचें मांस मनुष्यांचे खाण्यास अयोग्य आहे असें दिसेल त्या जनावरास परत करावें व परत केलेले प्रत्येक जनावराचे मालकानें त्यास लागलींच स्लाटर हाऊसचे बाहेर न्यावें आणि पास केलेलीं जनावरें स्लाटर हाऊस कमिटीचे मालकीचे असल्यास ठरविलेली फी देऊन मारण्याकरितां आंतील आंगणांत न्यावीं. परंतु स्लाटर हाऊसांत मांस विकूं दिलें जाणार नाहीं किंवा विकण्या करितां ठेऊं दिलें जाणार नाहीं.

( ४ ) वेळोंवेळीं म्यु० कमिटी ठरवील त्यावेळीं दररोज स्लाटर हाऊस उघडें राहील आणि स्लाटर हाऊस कमिटीचे मालकीचे असल्यास कमिटीनें नेमलेला अगर अधिकार दिलेला इसम सदर्हू वेळांत फी वसूल होईल त्याजबद्दल पावती देण्यास त्या ठिकाणीं हजर राहील. पावती खालीं दिलेले नमुन्या प्रमाणें असावी.

नियम ४ यांत दर्शविलेला नमुना—

तपासणोर अमलदारानें ज्याचें मांस मनुष्याचें खाण्यास योग्य ठरविलें आहे अशा जनावरास मारण्याबद्दल तुह्मी फीची रकम रुपये आणे दिली ती पावली.

तारीख माहे सन.

सेक्रेटरी म्यु०
क० अकोट.

## शिक्षा.

वर लिहिलेले नियमांपैकीं कोणताही नियम जो कोणी मोडील तो म्याजिस्ट्रेटा समोर गुन्हेगार ठरल्यास ५० रुपया पावेतों दंडाचे शिक्षेस पात्र होईल.

V. A. Kane
तारीख २० माहे आगष्ट सन १८९८ इसवी.
चेअरमन
म्यु० क० अकोट

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........ ०१ ०६

दुसरे खेपेस ..... ..... .....०१

# वऱ्हाडसमाचार.

Single copy ..........................4 as

Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII AKOLA MONDAY 12 SEPTEMBER 1898 NO 36

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १२ माहे सप्टेंबर सन १८९८ इ० अंक ३६

NOTICE

Tenders are invited for the contracts for the manufacture and supply of country spirit in the areas mentioned below of the Hyderabad Assigned Districts from the 1st April 1899:—

2. Tenders may be made for—

(*a*) the monopoly of manufacture and sale under the Bombay minimum guarantee system now in force in the said areas; or

(*b*) the manufacture and monopoly of supply to retail vendors under the Madras contract distillery system.

3. The duration of any contract will be fixed at the discretion and under the orders of the Resident at Hyderabad. Full particulars of the other conditions under which tenders may be made, and under which the contracts will be granted, can be obtained on application to the Inspector General of Excise, Hyderabad Assigned Districts, Amraoti Camp.

4. No tenders will be received after noon on the fifteenth day of October 1898.

5. The contract areas are as follows:—

(*a*) Ellichpur Distillery area.

Ellichpur District.—2 623 square miles with a population at the last census of 315,798.

Amraoti District —2,759 square miles; population 655,645.

Note—As regards this area, tenderers may offer for the contract under either or both systems for the Ellichpur district alone, or for the Amraoti district alone, or for the whole of the Ellichpur distillery area, which includes both the Ellichpur and the Amraoti Districts.

(*b*) Akola Distillery area.

Akola District.—2,659 square miles; population 574,782.

Malkapur Taluk (of the Buldana District).—791 square miles; population 177,877.

W. HASTINGS, MAJOR,
*Inspector General of Excise,*
*Hyderabad Assigned Districts.*

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै
१८९८ } . G. Watson
ent.

## आमचें नष्टचर्य कधीं संपणार.

हिंदुस्थानांतील राजनिष्ट प्रजाजनांच्या सुखदुःखाचीं राज्यसूत्रें आपल्या हातीं घेऊन सिमल्याच्या थंड हवेंत वास करणाऱ्या नामदार लार्ड एल्गिन साहेबांची व आमची लवकरच तुटातुट होणार आहे. कारण नामदार साहेबांचे पाठीमागून ना. कर्झन साहेब हे हिंदुस्थानचे अधिपती नेमल्या प्रमाणें ते जानेवारींत इंडियांत येतील. नाम. साहेबांनीं हिंदुस्थानचीं सूत्रें पाच वर्षें हातीं घेतलीं तितक्या अवधींत काय काय अनिष्टकारक गोष्टी घडून आल्या, दयाळू, शांत, व उल्हासी असा ना. साहेबांचा स्वभाव असतांना त्यांना काय काय गोष्टी करणें भाग पडलें, स्वतःच्या मतावरच अवलंबून राहण्या इतकी मनांत हिंमत नसली ह्मणजे मनुष्याच्या हांतून कस कशा वाईट गोष्टी होण्याचा संभव असतो इत्यादि प्रजापक्षास घातुक अशा महत्वाच्या गोष्टीचें थोडेंसें विवेचन केलें असतां निरर्थक होणार नाहीं असें वाटतें. नामदार साहेबांनीं हिंदुस्थानांत येण्याकरितां निघण्याच्या अगोदर विलायतेंतील लोकापुढें केलेलीं विधानें, हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पाय टाकतां क्षणींच कशीं विलयास गेलीं याचा विचार विलायते करितां निघण्याचे वेळीं नामदार साहेबांचे ध्यानीं आल्यावांचून राहणार नाहीं. नामदार साहेबांचे कारकिर्दींत एकंदर ज्या ज्या गोष्टी घडून आल्या त्यापैकीं हिंदु मुसलमानाचे दंगे, हिंदुस्थानांत भयंकर दुष्काळ, प्लेग, सरहद्दीवरील लढाई. वर्तमानपत्रांवरील खटले, सरदार नातु बंधूची उचलबांगडी, जुलमी राजद्रोहाचा कायदा, व या सर्वांस आणखी अंगभूत अशा अनेक गोष्टी घडल्या, या पांच वर्षांचा इतिहास लिहिणारास या वरील गोष्टीचें चित्र चांगलें मनोवेधकच उठवावें लागेल. त्यापैकीं पहिली ह्मणजे हिंदु मुसलमानाचे दंगे या संबंधानें नामदार साहेबांनीं फार अनुदार पणानें वर्तन दाखविलें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कित्येक शतकें पर्यंत हा हिंदुस्थान देश मुसलमानी अंमला खालीं होता, त्या अवधींत हिंदु मुसलमानामध्यें दंगेधोपे किती झाले, व इंग्लडच्या ताब्यांत आल्यावर वरचेवर दंगे धोपे कां होतात या प्रमाणें नामदार साहेबांनीं नीट परिक्षण न करितां हा सर्व आरोप राजनिष्ट प्रजाजनांच्याच माथीं मारण्यांत नामदार साहेबांनीं फार महत्वाची चूक केली. जाती जातींत उत्पन्न झालेला तिरस्कार हा राज्याचें नुकसान करणारा नसून फायदेशीर आहे अशा प्रकारच्या कल्पना कित्येक मुत्सद्दी लोकांच्या मनांत घोळत असतात. त्याच तत्वावर अशा प्रकारचा प्रश्न नामदार साहेबांनीं लोटून दिला कीं काय अशा प्रकारचे विचार कित्येकांचे मनांत येऊं लागले व ते येणें हें कांहीं अंशीं साहाजिक ही आहे. हिंदु मुसलमानांत एकी होऊन सरकारास जितका फायदा होण्या सारखा आहे त्यापेक्षां एकमेकांत दुही होऊन जास्त फायदेशीर गोष्ट होईल अशा तऱ्हेची कल्पना मनांत आणणें हें शांतताप्रिय सरकारास केव्हांही लाभणार नाहीं, असेंच कित्येक विचारी मनुष्यांचें मत पडेल. दुसऱ्या गोष्टींविषयीं ह्मणजे हिंदुस्थानांत जो भयंकर दुष्काळ पडला याजबद्दल नामदार साहेबांनीं कोणत्याच प्रकारें प्रजावात्सल्यास शोभणारें कृत्य केलेलें दिसत नाहीं. इ० स० १८७७ सालीं दुष्काळ पडला. व १८९६।९७ सालीं पडलेला दुष्काळ यांत फार अंतर असून लोकांत किंचित्‌ही त्राण उरला नाहीं हें पक्षेपणीं ध्यानांत न आणून व रयतेच्या कंगाल स्थितीकडे न पाहून अनुदारपणाचें, व मायबापगिरीस साजेसें कृत्य सरकाराकडून झालें नाहीं असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. पुण्याच्या सार्वजनिक सभेनें दुष्काळाच्या दिवसांत कंगालगिरीनें पिडिलेल्या देश बांधवास सरकारी अधिकाऱ्यांनीं रयतेच्या सुखाकरितां प्रसिद्ध केलेल्या फॅमिनकोडच्या कलमांतील अर्थ समजाऊन सांगून सारा न द्यावा अगर कशा रीतीनें द्यावा वगैरे बद्दलची माहिती देण्याकरितां आपले सुशिक्षित एजंट पाठविले परंतु सरकारांनीं अशा कृत्याचा भलताच अर्थ घेऊन राज्याची उलथा पालथ करण्या करितां एजंट पाठवून प्रयत्न होत आहेत अशा अर्थाचा गैरसमजुतीनें झालेला समज दूर करण्याचा प्रयत्न केला नाहीं; उलट अशा लोकांना हिंदुस्थानांतील अपराध्यास शिक्षा करण्याच्या कायद्या अन्वयें शिक्षा मात्र झाल्या. गरीब शेतकरी लोकांची उपासमार झालेली पाहून कोणाचेंही अंतःकरण कळवळल्या वांचून राहिलें नसतें. विलायतेंत दुष्काळपिडीत लोकांकरितां जो मोठा फंड जमविण्यांत आला त्याचा विनियोग कसा काय फायदेशीर झाला, व त्यापासून प्रजाजनांना कोणकोणत्या गोष्टीबद्दल फिकीर करण्याचें कारण राहिलें नाहीं याजबद्दल कांहींच निकाल नामदार साहेबांनीं केला नाहीं.

प्लेग संबंधानें ही नामदार साहेबांस आमचें कांहीं विशेष ह्मणणें आहे असें नाहीं. प्लेगचा रोग नामदार साहेबांनीं उत्पन्न केला नाहीं किंवा हिंदुस्थानांतील लोक मृत्युमुखीं पडून लोकसंख्या कमी व्हावी असा नामदार साहेबांचा हेतु होता असें ही नाहीं.. परंतु घरच्या कुत्र्याचा पाय लंगडा झाला पाहून ज्या प्रमाणें शेकडोशें गोष्टी योजून बचावा करितां भगीरथ प्रयत्न करण्यांत येतात, त्या प्रमाणें दुष्काळानें त्रस्त झालेल्या प्रजाजनांच्या मार्गें प्लेगनें सारखा मृत्यूचा तडाखा चालविला असतां, उन्हातान्हांत राहण्याची गैरसोय करून हंतरा पांघरावयास कांहीं नसल्यामुळें कित्येक दिवस पर्यंत सेग्रिगेशन मध्यें राहण्याची पाळी आलेल्या गरीब अनाथ दुबळया रयते करितां कांहीं प्रयत्न करण्यांत आले नाहींत, व त्या ठिकाणीं अतिशय मारवाडी कंजुषपणा सरकारांनीं व्यक्त केला. धर्माच्या बाबतींत जुलूम कोणत्याही प्रकारचा होणार नाहीं अशा प्रकारचें अश्वासन १८५७ सालच्या प्रसिध्द शिपायांच्या बंडा नंतर हिंदुस्थानांतील प्रजाजनांस महाराणी सरकारांनीं प्रसिध्द जाहिरनाम्यांत दिलें आहे त्या तत्वावर प्लेगच्या व्यवस्थेंत नेटिव्ह व्हलंटियर बरोबर सोजीर लोकांना देण्याचें कांहीं कारण नव्हतें असें असून त्या बाबतींत सरकारांनीं आग्रह धरला, व लोकांनीं त्रासल्या मुळें ह्मणा अगर कशानेंही समजा रॅन्डसाहेबांस कोणी दुष्टांनीं गोळीनें मारिलें, व हिंदुस्थानांत बंड होणार अशा तऱ्हेच्या संशयात्मक कल्पना सर्वत्र अधिकाऱ्यांचें मनांत आल्यामुळें राजपक्षाची अतीशय जोराची सार्थकता दृष्टीस पाडण्याकरितां वर्तमानपत्रावर हिंदुस्थान सरकारानें फिर्यादी केल्या. प्लेगचे त्रासदायक दिवसांत सरकारच्या व रयतेच्या हितास अवश्यक अशा प्रयत्नांची योजना करून ज्या ना० टिळकांनी जिवापाड मेहनत केली त्यांनाच राजद्रोही ह्मणून न्यायासनासमोर आणून शिक्षा ठोठावली. श्री. नातु बंधूस स. १८२७ च्या कायद्या अन्वयें अचानक उचलून कारागृहांत ठेविलें, व ज्या कायद्यानें त्यांना पकडलें त्या कायद्याचा वास्तविक अर्थ करण्याकडेही सत्यप्रिय सरकारचें लक्ष गेलें नाहीं. नातु बंधूंची एस्टेट जप्त करण्या इतकी कायदेशीर परवानगी नसतांना जप्त करण्यांत आली. आतां सरहद्दीवरील लढाई संबंधानें दोन शब्द लिहिले ह्मणजे हें

इंग्लंड व वेल्स या दोहों मिळून अविवाहित स्त्रियांची संख्या अविवाहित पुरुषापेक्षां दोन लक्षांनीं जास्त आहे.

बर्लिन हें सगळ्या जगांत अगदीं निरोगी शहर आहे असें पुष्कळांचें ह्मणणें आहे.

काश्मीर व रोम या दोन शहरांचा व्यापारांत संबंध आज जवळ जवळ सोळाशें सतराशें वर्षांचा आहे. काश्मीरची शालही जगप्रसिद्धच आहे.

पोष्टांच्या तिकिटांना व पाकिटांना जो डिंक लावलेला असतो तो बटाट्याचा असतो.

सगळ्या इराणांत आगगाडी सारी वीस मैलपर्यंतच केलेली आहे.

इंग्लंडमध्यें जें प्रत्येहीं दंव पडतें त्याचा साऱ्या वर्षाचा जर आढावा काढला तर पांच इंच पावसा बरोबर भरेल.

सगळ्या जनावरांमध्यें घोड्यांना थंडी अगदीं हलोहाल होते.

युनायटेड स्टेटसमध्यें क्विनाईन अरिष्ट खपतें. तें इतकें कीं, साऱ्या जगांत जितकें किनाईन तयार होतें त्यापैकीं निम्मे त्या देशांत खपतें.

एक वर्षभर वॉच सारखें चालू असले तर त्याचे टिकटिक १६०१४४००० इतक्या वेळां होतें.

जर्मनींत अलिकडे कागदाचे स्टॉकिंग्स फारच वापरूं लागले. कापडा पेक्षां ते थंडीच्या जास्त उपयोगी असें त्यांचें ह्मणणें आहे.

युरोपची संख्या प्रत्येक सहाशें साडेसाहाशें वर्षांनीं दुप्पट होते.

कोरिया प्रांतांतील बहुतेक शहरीं सूर्योदयाला दरवाजे उघडून सूर्यास्ता बरोबर लावतात.

सगळ्या जगांत अतिशय मोठें पुष्प सुमात्रा बेटांत आहे. त्याचें नांव राफ्लेसिया आर्नोल्डी. त्याचा परीघ सुमारें ४० इंच असतो.

डार्विननें असें शोधून काढलें आहे कीं ज्याप्रमाणें मनुष्यांत कांहीं वेडसर माणसें असतात, त्याप्रमाणें जनावरांतही वेडगळ जनावरें आहेत.

परमेश्वराची सर्वांत अत्यंत अमोलिक देणगी शरीरसंपत्ति होय. ज्यास तीं नाहीं त्यांच्या सारखा दुर्दैवी दुसरा कोणीच नाहीं.

मर्यादा हें कोंदण होय; त्यांत पुरुषही शोभतात व बायकाही शोभतात. पण बायको विशेष शोभते.

आपले वैरी आपल्या मनाला कितीही शुद्ध रीतीचें वाटेल, तरी जनांत तें विरुद्ध दिसेल असें करूं नये.

आजकाल जगांत चालूं नाणें "हांजी हांजी" हें होय; तें ज्याजवळ नाहीं त्याला जगबाजारांत धक्के बसले ह्मणून समजा.

थोरांच्या अज्ञानाला बडबडण्याला वक्तृत्व ह्मणतात. आणि गरिबांच्या बडबडण्याला, वाचाळता ह्मणतात.

लक्ष्मीवान जे आहेत त्यांना पराक्रमाची किंमत नसते.

तारुण्य हें मुद्दामच तयार केलेलें खिशांतलें घड्याळ आहे. त्याच्याशीं धिंगामस्ती न करितां बेतानें वापरलें तर तें पुष्कळ दिवस टिकेल. क०

सोलापूरच्या म्युनिसिपालिटीनें पानसुपारीचा करण्याचा खर्च म्युनिसिपल फंडांतून केला होता! त्याजबद्दल दिवाणींत फिर्याद होऊन हा खर्च म्युनिसिपल फंडांतून करूं नये असा ठराव होऊन खर्च झालेल्या रकमा मेंबर लोकांनीं आपल्या स्वतःच्या पैशांतून भराव्या असा निकाल झाल्याचें कळतें.

गेल्या गुरुवारीं बंगलोरास सुमारें दहा हजार अडाणी जातीचे लोक चालू असलेले प्लेगचे नियम फार गैरसोईचे आहेत वगैरे राणीसाहेबांस सांगून ते बंद करविण्यासाठीं राजवाड्याभोंवती जमले होते. त्यांना वाड्यांतील पोलीसाकडून घालवून देतां येईना ह्मणून रेसिडेंट साहेबांनीं लष्करी लोक आणून त्यांना घालवून दिलें. नंतर त्यांस दिवाणसाहेब त्यांच्या दृष्टीस न पडल्यामुळें त्यांना शिव्यागाळी देत तेथून जावें लागलें.

नानीताल येथें एक मोठा कडा कोसळून पडला, व त्याखालीं एक युरोपियन व कांहीं मजूर मृत्यु पावले. सु०

जर्मनीच्या बादशहाच्या रोजच्या बसण्याच्या गाडींतून विजेचे दिवे लावतात.

कॉडलिव्हर जातीच्या माशाचें तेल ज्या प्रमाणें काढतात तसें प्यासिफिक समुद्राच्या उत्तरेकडील प्रदेशांत मगरीचें तेल काढून कॉडलिव्हर आईलसारखा त्याचा उपयोग करितात.

सगळ्या जगांत आगगाडीनें दर आठवड्याला कमींत कमी ४,००,००,००० इतके लोक प्रवास करितात असें एकानें शोधून काढलें आहे.

एका पारिस शहरांत ५०००० लोक अफू खाणारे आहेत- त्यांत फक्त अफू खाणाऱ्या स्त्रिया ३०००० आहेत.

डान्डेलियन नांवाचें एक लहानसें झाड आहे. त्यांची दोन किंवा तीन पानें जर रात्रीं निजतेवेळीं चघळलीं तर तावडतोब झोंप लागतें. त्याचें फूल पिवळ्या रंगाचें असतें.

दरवर्षी नुसत्या लंडन शहरांत २,००,००००० इतकें ग्यालन दुध आगगाडीनें बाहेरून विक्रीला येतें.

सगळ्यांत कमी मुळाक्षरें सॅण्डवुइच बेटांतल्या भाषेंत आहेत. तीं सारीं बाराच आहेत. आणि सगळ्यांत जास्त मुळाक्षरें टारटरी भाषेंत आहेत. तीं २०२ आहेत.

रोमचा पोप आपली राजनिष्ठा दाखविण्याकरितां दरवर्षी तो जें सुवर्ण गुलाबपुष्प आपल्या राजास नजर करितो त्याची किंमत वीस हजार रुपये असते.

लंडन शहरांत ४०० यार्ड लांबीचे दोन मोठे रस्ते आहेत. त्यांचीं नांवें डीन स्ट्रीट व वेस्टर्न स्ट्रीट अशीं आहेत. ते दोन्ही रस्ते जमिनीच्या खालून खोदून तयार केलेले आहेत. रात्रंदिवस त्या रस्त्यावर ग्यासच्या दिव्याचा उजेड असतो.

आस्ट्रेलियांत १३००००० आयरिश लोकांची वस्ती आहे. क०

बायकांची विक्री.—औरंगाबाद जिल्ह्यांतील दरवडेखोर भिल्ल लोकांचे पुंडाईची कच्ची हकीकत इंग्रजी पत्रांतून प्रसिद्ध होऊं लागली आहे. त्यावरून कळतें कीं, ह्या भिल्ल दरवडेखोरांनीं मांवकरी लोकांच्या बायका पळवून त्या ९९ रुपयांस विकून टाकण्याचा कारखाना चालविला होता, तसेंच कांहीं बायकास पळवून आणून त्यांला उलट्या टांगून ठेवावयाच्या आणि त्या रुपये देण्यास तयार झाल्या ह्मणजे त्याजपासून २५।५० याप्रमाणें येतील तितके रुपये घेऊन मग त्यास सोडून द्यावयाच्या अशाही क्रम चालविला आहे.

पुण्यावर प्युनिटिव्ह पोलीसचा जो खर्च लादला होता तो सरकारानें माफ केला, हें कळविण्यास आह्मांस मोठा संतोष वाटतो.

पहा ही फसवेगिरी!—थोडे दिवसापूर्वी लंडन येथील व्हिक्टोरिया स्टेशनवरील प्लॅटफॉर्मावर एक चमत्कार दृष्टीस पडला. एक मध्यम वयाचा श्रीमान् गृहस्थ उभा असतां एक तरुण अठरा वीस वर्षांची देखणी व झुळझुळीत पोषाख केलेली स्त्री एकदम येऊन त्याच्या गळां पडली, आणि त्याला कडकडून आलिंगन देऊन मोठ्या सद्गदित कंठानें व विलापयुक्त स्वरानें ह्मणूं लागली: अरे माझ्या बाबा! तूं मला किती दिवसांनीं रे भेटतोस? इतका निर्दय कसा रे तूं झाला होतास? आणि आह्माला टाकून तुला एकटें कसं रे राहवलं? आह्मी कशीं रे तुजवांचून गाय झालों होतों? आतां मीं तुला कधींही सोडणार नाहीं! इत्यादि. आणि असं ह्मणून ती एक सारखी ओक्सा बोक्सी रडत होती व डोळ्यांतून खळ खळ अश्रुपात करीत होती. नंतर तिनें कांहीं वेळानें त्याचेकडे निरखून पाहून त्याचे अंगाचा विळखा सोडला; व कावऱ्या बावऱ्या दृष्टीनें त्याचे कडे बघून, 'अगबाई! हें कोण? मी आपली चुकून माझे बाबा ह्मणून मी त्यांस कवटाळलं पण हा बाई कोणी भलताच पुरुष आहे' असें ह्मणून दूर झाली. तों त्या पुरुषानें तिला कवटाळून घट्ट धरलें, आणि 'अगे! मी भलताच पुरुष नसून तुला पक्के ओळखणारा आहें. किती दिवसां पासुन, मला तुझी भेट घ्यावयाची होती; ती आज अनायासें झाली, असें ह्मणून, त्यानें तिला अधिकाधिक कडकडून आलिंगन देण्याचा भाव केला. व एकीकडे पोलिसाला एकसारख्या हांका मारण्याचा सपाटा लाविला. आणि मग पोलिस आल्यावर त्याचे स्वाधीन तिला करण्यांत आलें. पोलिसानें तिला पकडून तिचा झाडा घेतला. त्यांत तिच्याजवळ, तिनें त्या गृहस्थाला आलिंगन देण्याची जी माया दाखवून चपळाई केली तींत तिणें त्याच्या गळ्याजवळची हिऱ्याची टांचणी आणि त्याच्या खिशांतलें सोन्याचें घड्याळ अशीं चोरलेलीं सांपडलीं. पुढें तिची पोलिसांकडून रीतीप्रमाणें व्यवस्था लागली!

मद्रासेंत मि. कोचमन नांवाचे असि. कले. साहेब आहेत. ते एक दिवस घोड्यावरून फिरत असतां मुदनुर्ली नांवाच्या गांवांत गेले; तेथें त्यांचे आंगावरील सर्व कपडे भिजले; आणि साहेबांना क्षुधाही लागली होती परंतु त्यांचीं चाकरमाणसें मागें राहिल्यामुळें दुसरी कांहीं सोय नाहीं असें पाहून, ते गांवच्या कुळकर्ण्याकडे गेले, आणि कांहींतरी सुका कपडा आणि तोंडांत टाकायला कांहीं तरी द्या असें त्याला ह्मणाले. कुळकर्ण्याला हा अपूर्व योग वाटला, आणि त्यानें लगेच एक चादर साहेबास दिली. ती ते मराठे लोकांच्या पद्धतीप्रमाणें नेसले, आणि मग खायाला मागूं लागले. तेव्हां कुळकर्ण्यानें सांगितलें कीं साहेबांकारितां इंग्रजी तऱ्हेचा खाना आणण्यास मी मनुष्य पाठविला आहे, तो इतक्यांत येईल. परंतु साहेब ह्मणाले, तो येईपर्यंत मला फुरसत नाहीं. तुमच्या घरांत ह्या वेळीं जें काय खाण्यासारखें असेल तें द्या. ह्या गरिबाच्या घरांत त्यावेळीं फक्त पेजेचें पाणी होतें, तें त्यानें पुढें केलें. साहेबांनीं हिंदुपद्धतीप्रमाणें जमिनीवर बसून पिंपळाच्या पानाचे द्रोणानें ती पेज प्राशन केली आणि जठराग्नि तृप्त केला. पुढें साहेबांचीं चाकरमाणसें आल्यावर ते उतारूंच्या बंगल्यांत गेले. आणि तेथें सकाळच्या कुळकर्ण्यास बोलावून नेऊन त्यांनीं त्याला आपल्या खिशांतलें २०० रु० किंमतीचें सोन्याचें घड्याळ बक्षीस देऊन कृतोपकाराची फेड केली. ज्ञा०

हिंदु देवालय आणि मुसलमान अधिकारीः—वरंगल येथें रामप्पांचें नामक फार पुरातन शिवालय आहे. देवळांतील दोन पुतळे बाहेरच्या अंगास देवळांत ठेवलेले होते, ते तेथील मुसलमान अधिकाऱ्यानें उचलून नेले आणि ते आपल्या दारांत ठेविले आहेत. हा मुसलमानी अधिकारी इंग्रजींतील डिस्ट्रिक्ट डिपुटी कलेक्टरच्या दर्जाचा आहे. त्याच्या या दांडगाईच्या व धर्मभ्रष्टतेच्या कृत्यामुळें वरंगलची हिंदुप्रजा अप्रसन्न कष्टी झालेली आहे. शेंकडा ९३ पेक्षां जास्त हिंदुलोक वरंगल येथें आहेत व त्यांचीं मनें अत्यंत क्षुब्ध झालीं आहेत त्यामुळें इंग्रज सरकारांकडे दाद मागण्याचा त्यांनीं विचार चालविला आहे असें कळतें.

निजाम सरकारानें या प्रकरणाची अवश्य आणि सत्वर दाद घ्यावी यांतच भूषण आहे.

पत्रकर्त्यांशी मारामारीः—मशीरइ दख्खन नांवाच्या हैद्राबादेंतील वर्तमानपत्राचे मालक बाजीराव नामक गृहस्थाशीं होम आणि ज्युडिशियल सेक्रेटरीचे पर्सनल असिस्टंट मि. डी यांनीं ते कचेरींत आले असतां अंगावर चाल करून मारामारी केली असें वर्तमान बाहेर आलें आहे. जास्त हकीकत पुढें मिळेल तशी देण्यांत येईल.

हैद्राबाद व्हाली रेल्वेचें काम [illegible] झपाट्यानें चाललें आहे. येत्या मार्चमध्यें जालना पर्यंत रेल्वेकडून उतारू नेण्यांत येतील असें ह्मणतात. हल्लीं रेल्वेचें बांधकाम चाललें आहे तेथें चोऱ्या, दरोडे, खून यांचा अगदीं उत आला आहे ह्मणतात.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत रु० १

दर ओळीस........८१ ८६

दुसरे खेपेस .... .... ....८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Six monthly......... 3 .............. 8 as

Single copy ..................................4 as

' Advertisement

Below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line...3 as

VOL XXXII AKOLA MONDAY 19 SEPTEMBER 1898 NO 37

वर्ष ३२ आकोला सोमवार तारीख १९ माहे सप्टेंबर सन १८९८ इ० अंक ३७

## जाहिरात.

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेविंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८

A. G. Watson ent.

### नोटीस

टमकाई मर्द कालुराम लहरीये राहणार मौजे ह्मैसांग तालुके व जिल्हे अकोलें यांस नोटीस लिहून देणार पन्हाबाई मर्द मनुसिंग लहरीये राहणार बुसर ता० व जिल्हे अकोलें इजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुझा नवरा कालुराम वल्लद नानसिंग यानें माझा नवरा मनुसिंग वल्लद जिवनसिंग याजला मौजे ह्मैसांग येथील सेंव नंबर ३३ चे सालीम शेताबद्दल रुपये ९५ चे गहाणखत तारीख १७ एप्रील सन १८९४ इ० चे लिहून दिलें तो दस्तैवज मी नारायणराव बाबुराव देशमुख ह्मैसांगकर याजला रुपये ९५ यांस खरेदी दिला करितां आतां गहाणा बद्दल रुपये आह्मांस न देतां मशारनिल्हे यांस द्यावे. कळावें. तारीख १२।९।९८ इ०

सही

पन्हाबाई मर्द मनुसिंग लहरीये निशाणी खुद्द हातची बांगडी

## जाहिरात

खालीं सही करणार याजकडून सर्व लोकांस जाहीर करण्यांत येते कीं उमरावती येथें नारायणराव तयबभाई नांवाची शराकतीची स्टेशनरी सामानाची दुकान आहे, त्यापैकीं तयबभाई नावाचा हिस्सा आह्मी अबदुल कयुम वल्लद मुला हसनजी याजवळून तारीख २३ माहे जून सन १८९८ इसवी रोजीं खरीदी घेतला आहे या पुढें त्या दुकानावर त्याचा कांहींएक हक्क संबंध राहिला नाहीं आह्मी त्या हिश्शाचे मालक झालों आहों व तो दुकानावर फक्त नोकर आहे. कळावें ता० १४ माहे सप्तंबर सन १८९८ इ०

( सही ) अबदुल हुसेन मुनवर अली

दस्तुर खुद्द.

## अहल्याचरित काव्य

नंबर ४

असे सतत ऐकते सतत बोलते मीच ते ।
प्रमाण न ह्मणों जरी उचित माझिया नीचते ॥

मोरोपंत.

न्यायाधिशा पुढें गुन्हेगारावर कांहीं विवक्षित गुन्हा केल्याची शाबिदी होऊं लागली ह्मणजे कित्येक गुन्हेगार आपली सुटका होण्याचें आशेनें अथवा दुसऱ्यांनीं केलें तेंच आह्मी केलें यांत आपले स्वतःचा कांहीं दोष नाहीं असें भासविण्याचे इराद्यानें आपले शेजारी पाजारी अथवा दुसरे कांहीं सभ्य थोर गृहस्थ यांचीं नांवे घेऊन आपल्या बरोबर त्यांसही दोषी करावयास पाहात असतात हें वाचकांस व्यवहारांतील कांहीं अनुभवा वरून प्रत्ययास आलें असेल. परंतु परिणामीं दोषी तो दोषीच. असाच प्रकार रा. शेवडे याचे काव्यावर दोषात्मकतेची पुराव्यानिशीं शाबिदी होत असतां मागील एका लेखांत " नेमस्त विचारी ऊर्फ नेमस्त शहाणा " हें नांव धारण करणाऱ्यानें केला आहे. काबीळ झालेले रोग्यास ज्या प्रमाणें जगांतलि सर्व वस्तु पिवळ्या भासावयास लागतात त्याप्रमाणेंच या नेमस्त शहाण्यास आपली वस्तु दोषात्मक असल्यामुळें सर्व जग दोषात्मक भासूं लागलें आहे तें इतकें कीं, त्यानें आपले दावणींत प्राचीन कविश्रेष्ठ तुकाराम, वामन पंडित, मोरोपंत यांस ही गोंवण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तविकपणें अशा असमंजस लेखास नुस्तें महत्व देण्याची आमची बिलकूल इच्छा नव्हती परंतु तसें केल्यानें कदाचित् वाचकाचें मनावर कांहीं प्रकारचा अनिष्ट परिणाम राहील अशा भीतीनें आजचे अकांत राव बहादूर न्यायमूर्ति रानडे यांनीं सुमारें चार पांच महिन्यापूर्वी Times of India नांवाचे इंग्रजी वर्तमानपत्रांत " मराठी वाङ्मयाची वृध्दि " या विषयावर जे कांहीं उत्कृष्ट लेख लिहिले आहेत त्यांत मराठी भाषेतील प्राचीन कवींचे ठायीं असणारे अपूर्व गुण अलिकडील काळीं झालेला काव्यशक्तीचा ऱ्हास आधुनिक कवींचे अंगीं प्राचीन कवींचे स्वारस्यतेचा अस्पष्ट प्रत्यय वगैरे संबंधानें ही विवेचन केलें आहे तें थोडक्यांत देण्याचें योजिलें आहे. या विद्वन्मुगुटमणीचा हा लेख वरील नेमस्त शहाणे यांस व ज्यांस मराठी भाषेचे कवीवर उगीच नाक वर करण्याची खोड लागली आहे अशांस वाचण्याविषयीं आह्मी आग्रहपूर्वक शिफारस करितों.

'In all, the list of old Marathi writers of note comes to about forty, commencing with Mukundaraja and Dnyaneshvara, and coming down to the birth of the present century. As a list of the more prominent of these names may prove of some use we give below the names of the more reputed among them—Mukundaraja, Dnyaneshvara, Namdeva, Eknath, Amritaraya, Ramadasa Mukteshvara, Tukaram, Vaman Pandit, Moropant, Shridhara, Raghunath Pandit, &c. &c. A more brilliant galaxy of names it would be difficult to find in the literature of any other language of India. To seek to minimise the value of this treasure by saying that it is only a reflex of Sanskrit poetry is to confess ignorance of the most characteristic feature of this department of Marathi literature. * * * By the side of the works of these ancient poets, we can hardly name any of those who have distinguished themselves in this department of Marathi literature since the British conquest of the Deccan. Some how, the poetic fire has become extinct with the loss of political power. The lights that have been lit are few and far between and their luster has been for the most part borrowed and not spontaneous. * * * The fire, the spontaniety, & the keen moral introspection, which is the charm of Tukarama's writings, the didactic sense and wisdom which distinguishes Ramdasa, the thrilling descriptions which distinguish Shridhra and Mukteshvara, the quaint though very suggestive illustrations of Dnyaneshvara, the sweet flow of Amritaraya, the appeal to the tender feelings so characteristic of Vaman Pandit, the purity of diction, the command over words and the high purpose of Moropant, the devotion of Namdeva and Mirabai, the inspiring thought of Eknath, abrupt truthfulness of Ramajoshi, ornate metaphorical surprises of Raghunath Pandita, all these seem to find but faint echoes in our modern poets some of whom have indeed taken for their models the best English specimen both in the choice of subjects and in the treatment of the same! * * 'Any how, it is clear than unless our young men study not only classical and English models bot also the works of their own ancient poets, furfher growth and development in this department of our literature is impossible. No mere foreign graftings, can ever thrive and flourish, unless the tender plant on which the grafting s to be made first germinates and sends its roots deep in its own indigenous soil. When the living tree is thus nourished and watered the foreign manner may add flavour and beauty to it. Poets are born and not made to order; they are growths and not manipulations, and there is but little hope of a brighter future in the development of Modern Marathi poetry unless the poetical fire is rekindled in the highest places by early contact with the inpiring study of the best minds of their own race.'

### भाषांतर

" ज्ञानेश्वर व मुकुंदराज येथून चालूं शतकाच्या प्रारंभापर्यंत पाहूं गेलें तर एकंदर चाळीस प्रख्यात मराठी कवींची यादी तयार होते. त्यापैकीं मुख्य ह्मणजे मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, अमृतराय, रामदास, मुक्तेश्वर, तुकाराम, वामन पंडित, मोरोपंत, श्रीधर, रघुनाथ पंडित इत्यादि होत. ( मूल यादींत एकंदर २८ नांवें दिलीं आहेत. ) या पेक्षां प्रख्यात व शोभिवंत अशी नामावलि हिंदुस्थानच्या दुसऱ्या कोणत्याही भाषेंत आढळणें कठीण आहे. ह्या सर्व कवींची काव्यें संस्कृताचें प्रतिबिंब आहे असें ह्मणून त्यांची योग्यता कमी करूं पाहणें ह्मणजे वाङ्मयाच्या या शाखेच्या मुख्यांगाविषयीं शोचनीय अज्ञानाचें प्रदर्शन करण्या सारखें आहे ! × × × ब्रिटिश राज्याची संस्थापना झाल्या पासून वाङ्मयाच्या या शाखेत ह्या प्राचीन कवींच्या काव्य ग्रंथांचे तोडीचा एकहि ग्रंथ अर्वाचीन कवी कडून झाला नाहीं. कोणत्याही कारणानें कां होईना परंतु स्वराज्य नष्ट झाल्या बरोबर कवित्वाचा प्रदीप मालवला गेला. त्यानंतर पुष्कळ कालानें मधून मधून थोडेसे कवि निर्माण झाले परंतु बहुश. यांची स्फूर्ति उसनी आणलेली आहे आणि त्याचे काव्यांत साहजिकपणा ह्मणून दिसत नाहीं. + + + तुकारामाच्या कवितेस ज्यांनीं मोहकपणा आणिला आहे ते उत्साह, प्रसादादि गुण आणि नीतितत्वाचें उत्तम अंतर्ज्ञान, रामदासाची उपदेश करण्याची हतोटी व शहाणपण. श्रीधर आणि मुक्तेश्वर यांचीं वाचकास तल्लीन करणारीं वर्णनें, ज्ञानेश्वराचे विलक्षण परंतु प्रबोधक दृष्टांत, अमृतरामाचा मधुर अस्खलितपणा, वामन पंडिताची करुण रस उत्पन्न करण्याची शैली-मोरो पंताच्या वाणीचा प्रसाद, त्याची भाषेवरील सत्ता व त्याचा उन्नत संकल्प, नामदेव व मिराबाई यांचा भक्तिरस, एकनाथाचे प्रेरणाकारक शब्द, रामजोशाची एकदम विषयांतर करून सत्य सांगण्याची तऱ्हा, रघुनाथ पंडिताचें अलंकारसौष्ठव हे सर्व गुण अलीकडच्या कित्येक कवींनीं इंग्रजी कवींचें

अनुकरण करून त्यांच्या प्रमाणेंच विषय घेऊन त्यावर त्यांच्या प्रमाणेंच कविता लिहिण्याचा जरी क्रम सुरू केला तरी त्यांचे अंगीं फारच अस्पष्टतेनें प्रत्ययास येतात.

+ + कसें झालें तरी हें उघड आहे कीं आमच्या तरुण मंडळींनीं एकट्या इंग्रजीचेंच अध्ययन न करितां त्याबरोबर आपल्या प्राचीन कवींच्या काव्याचाही अभ्यास केला पाहिजे नाहीं तर या शाखेंत प्रगती होणें दुरापास्त आहे. ज्या झाडावर जडवें जडावयाचें तें झाड जोराचें होऊन त्याचीं मुळें त्याच्या देशच्या भुईंत खोल गेल्या शिवाय वर जडवें जडविण्यानें कांहीं उपयोग होणार नाहीं. मुळचें झाड जिवंत असलें तर परदेशीय खतानें त्यास सौंदर्य आणि स्वाद कदाचित् येईल. पण कवित्व जन्मतःच यावें लागतें तें तयार करून अंगीं आणतां येत नाहीं. आमच्या लोकांपैकीं सर्वांत हुशार माणसांच्या सहवासानें कवित्वाचा संचार झाल्या वाचून अर्वाचीन मराठी कवितेचा विकास होण्याची आशा मुळींच नाहीं.

न्यायमूर्तींनीं महाराष्ट्र भाषेंतील दैदीप्यमान अशा कविरत्नांचें वर जें योग्य अशा मोहक शब्दांनीं वर्णन केलें आहे तें पाहून ज्यास कविवर्यां विषयीं अभिमान अथवा पूज्यबुध्दि उत्पन्न होणार नाहीं तो पुरुष ' सवें मुक्तोऽथवा पशुः याच कोटी पैकीं कोणी एक असला पाहिंजे यांत संशय नाहीं. न्यायमूर्तींनीं प्रत्येक कवीचे काव्यांत जी कांहीं विशिष्ट मोहकता दिसून येते ह्मणून लिहिलें आहे त्याचे प्रत्यया करितां त्या त्या कवीचे ग्रंथातून ते ते उतारे देणें वस्तुतः अप्रासंगिक नाहीं परंतु स्थलसंकोचास्तव तसें करितां येत नाहीं याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करणें भाग येतें. असो. " नागुणी गुणिनं वेत्ति. ' गुणवान् पुरुषाला अगुणी मनुष्य जाणूं शकत नाहीं. क्रमिक पांचव्या अथवा साहाव्या पुस्तकांतील काव्या पलीकडे ज्यांचे अध्ययन गेलें नाहीं अथवा जो पराकाष्ठा तर नवनीताचीं पांच चार पृष्ठें उलटण्यांत महाराष्ट्र भाषेचा महासागर मंथन केल्याचें श्रेय अंगीं आणूं पाहातो त्या नेमस्त शहाण्यास वरील कविवर्य दोषरूपी भासूं लागावे हें त्याचे वरील जाड्या विद्वत्तेस उचितच आहे. न्यायमूर्ती वरील लेखामध्यें आधुनिक तरुण मंडळीस प्राचीन काव्यांचा अभ्यास करण्या विषयीं मनोभावापासून उपदेश करीत असतां आमच्या नेमस्त शहाण्यानें त्या कविवर्यांचे काव्यापासून मुलें बिघडत चाललीं आहेत ह्मणोन प्रतिपादन करावें याहून त्याच्या शहाणपणाच्या कमालीचें ढोबळ उदाहरण तें कोणतें पाहिजे? तसेंच न्यायमूर्तींनीं काव्यशक्तीचा अलीकडील कालीं ऱ्हास झाला ह्मणोन वरील लेखांत दुःख प्रदर्शित केलें आहे व तेंच आमच्या नेमस्त शहाण्यानें उलट उत्कर्ष होत चालला आहे ह्मणोन टिमकी बडविली आहे यावरून तर नेमस्त शहाण्याच्या योग्य किमतीचें प्रदर्शन निराळे शब्दांत करण्याची गरजच नाहीं ! कुंथ्याच्या प्रस्तावनेचे पारायण करून ज्यानें आपलें अंगीं ज्ञानाचे उसनें अवसान आणिलें आहे त्याचा प्रकाश कितीसा टिकणार ! मालविकाग्निमित्रामध्यें कालिदासानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे.:—

सन्तःपरीक्ष्यान्यतरद्भजन्ते ।
मूढःपरप्रत्ययनेय बुद्धिः ।

" चांगले लोक जे आहेत ते नीट परीक्षण करून दोहोंपैकीं कोणचें चांगलें तें निवडून काढून त्याचा स्विकार करितात. मूढ लोक मात्र दुसऱ्याच्या मता प्रमाणेंच आपलें मत देतात !

---

# वऱ्हाडसमाचार

मित्ती अधीक अश्विन शुद्ध ४ शके १८२०

---

श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मरणा नंतर महाराष्ट्राच्या इतिहासांत एक मोठा आणिबाणीचा प्रसंग येऊन गेला तो अवरंगजेबानें केलेली दक्षिणेवरील स्वारी होय. या कालाला उद्देशून नामदार न्यायमूर्ती रानडे यांनीं एक लेख ' मद्रास रिव्ह्यू ' मध्यें प्रसिद्ध केला आहे. तो लेख सध्यां आह्मापाशीं नाहीं तथापि त्यांतला त्रोट उतारा गेल्या ' इंडियांत ' आला आहे. त्यांत राजाराम महाराज यांच्या अंगीं त्यांच्या वडिलांचे सद्गुण वसत होते असें त्यांनीं सांगितलें आहे. शिवाजीचा तो धाडसी उद्योग, चतुराई, निर्व्यसनता, स्वभावाचा सौम्यपणा व उदारपणा, व आपल्या देशबांधवांत विश्वास उत्पन्न करण्याची अप्रतिम स्फूर्ती इत्यादि सर्व गोष्टी राजारामाच्या अंगीं खेळत होत्या. पुढें नामदार साहेब ह्मणतात कीं मराठे लोक कांहीं लुटारूच नव्हते. ते लिहितात कीं अवरंगजेबा सारख्या शत्रू बरोबर युद्ध करून विजयश्री संपादण्या सारखें काम लुटरू किंवा पेंढारी लोकांच्या हातून होत नसतें. महाराष्ट्रांतील शहाजोग नररत्नांची गुणप्रभा संकलित करणारी नैतिक प्रेरणा कांहीं निराळीच होती. साहसी वीरश्री, उत्कृष्ठ सहिष्णुता, कार्यधुरंधरपणा, निष्फल मनोरथ झाला तरी प्रदीप्त होणारी बळकट आशा, कधींही नढळणारा विश्वास, काल स्थल किंवा व्यक्ति यांच्या भेदभेदानें न ढळणारी परमोत्कर्षाविषयीं श्रद्धा, सामायिक संकट वेळीं बंधुप्रेम, पूर्ण स्वार्थत्यागाची बुद्धि, व समायिक कल्याणा साठीं परस्परीं लघुपणा, स्वकीय पक्ष धर्मवृद्धीचा ह्मणून त्याच्या अखेर जया विषयीं पूर्ण निष्ठा हे गूण त्या वेळच्या लोकामध्यें वास करीत होते.

या गुणांचा लोप आह्मामध्यें झाला आहे हें चाणाक्ष सूज्ञांस कळविण्याची गरज नाहीं. नामदार रानडे यांच्या हातून महाराष्ट्राचा इतिहास ईशकृपेनें लिहिला जाईल तर राष्ट्रीय सभेचीच कामगिरी इतिहासरूपानें नामदार रानडे खचित खचित करितील. ही आशा परमेश्वर सफल करो !

---

१८९६।९७ सालच्या दुष्काळामुळें आमच्या देशाची किती हानी झाली आहे याची कल्पनाच नीटशी पुष्कळांस नाहीं. हजारो लोक काळाच्या जबड्यांत सांपडले, घरंदाज पण मध्यम स्थितींतल्या लोकांचा चुरडा झाला आणि या राष्ट्राची प्रगती बंद होऊन लोकांचा पाय खोलांतच जात आहे. गेल्या दुष्काळांत अनाथ मुलें व गरीब विधवा यांची दैना फार उडाली. तीं देशोधडीला लागलीं इतकेंच नाहीं तर अद्याप त्यांची स्थावरा स्थावर झाली नाहीं त्या दुष्काळांत आमच्या लोकांचा नामर्दपणा व हलाखी पाहून मिशनरी लोकांनीं मात्र विलक्षण कंबरा बांधल्या. मिशनरी संस्थांचा दानधर्म मोठाच होता. त्यांच्या ख्रिस्तीधर्माच्या आपमतलबाला एवढा उत आला होता कीं अन्नान्न करणाऱ्या शेंकडो अनाथ मुलांस व बायांस मिशनरींनीं आपल्या येशच्या कळपांत ओढून घेतलें आहे. आपल्या राष्ट्राला इतक्या मोठ्या समूहाची धर्मभ्रष्टता अपमानकारक असून अत्यंत लांछनास्पद आहे हो अनाथ मंडळी आह्मी बाटविण्यासाठींच धर्म-खाटिकांच्या हातीं दिली आहे तेव्हां त्यांची भावी स्थिती काय होईल या गोष्टीकडे नजर देऊं नये असाच सर्व राष्ट्राचा आनश्चित पण दृढ संकल्प दिसतो. धर्मदृष्टीची उदासीनता पतकरली व आपल्या लोकांचें वीर्य व आशा हीं लोपल्यांत धरलीं ह्मणजे मिशनरी लोकांनीं प्राणरक्षणाची देणगी आमच्या नेटिवांपैकीं पुष्कळांस दिली याबद्दल त्यांचे आभार मानण्या पलिकडे आपलें काम कांहीं उरलें नाहीं.

त्या दुष्काळाच्या वेळीं आमच्या नेटिव लोकांनींही आपल्या देशबंधूंच्या प्राणरक्षणासाठीं नानाविध दानधर्म केले. अन्नछत्रें घातलीं, व अनाथ मुलें व बाया यांचें संगोपन केलें. या सत्कृत्याबद्दल कोणालाही विसर पडणार नाहीं. पण अशा दुष्काळा पासून जसें ज्ञानांजन मिळावयाला पाहिजे होतें तसें मिळालें नाहीं किंवा वृक्षादिकां प्रमाणें गत गोष्टी आपण विसरलों व संप्राप्त स्थितीला भुलून मान डोलवीत आहों पुन्हां असली राष्ट्रीय संकटवेळा न यावी अशा विषयीं आमच्या लोकांनीं कांहीं विशेष तजवीज अमलांत आणिल्याचें दिसत नाहीं. कदाचित् अशा स्वकीय अनास्थे विषयीं आपला सर्वांचाच नाईलाज झाला आहे ह्मटलें तरी चालेल.

आह्मी आपल्या राष्ट्रीय लघुत्वा विषयीं व हीनते विषयीं कटू लेख लिहिल तरी त्या पासून फायदाच होईल असेंही सांगता येत नाहीं. तथापि आमच्याकडे मुंबईकडील केळवे माहिम येथून या दुष्काळांतील कांहीं महत्वाच्या गोष्टी संबंधानें एक पत्र आलें आहे. त्या गोष्टींकडे सर्व लोकांचें लक्ष जाईल तर मोठा फायदा होण्या सारखा आहे. एक विशिष्ट व अत्यंत हितकारक अशा प्रकारचा दानधर्म आह्मी सांगूं इच्छितों.

केळवे माहिम येथें गेल्या दुष्काळांत एक दानधर्म करण्यासाठीं मंडळी निघाली होती तिच्या म्यानेजरांचा नांव कळविण्याचा हेतु नाहीं. ते लिहितात कीं सर्व पत्रकर्त्यांनी खालील मजकूरास धर्मकृत्य ह्मणून अवश्य स्थळ द्यावें.

" सन १८९६ व १८९७ सालीं जो दुष्काळ पडला त्या दुष्काळांत सरकारी अंमलदार व इतर लोकांकडून अनाथ मुलें पोसण्यासाठीं गोळा करूं लागलो तों त्यांची संख्या १२०० वर गेली दुष्काळ संपतांच मुलांच्या वारसास कळविल्या प्रमाणें कित्येकांनीं मुलें नेलीं व बाकी ७८१ मुलें राहिलीं. या सर्वांचें पोषण कांहीं धर्मार्थ पैसा आला त्यावर व ये. जे. आर पी आणि कंपनीच्या म्यानेजरानें स्वतःची रकम ३९००० रुपये यावर त्या मुलांचें पोषण केलें आतां म्यानेजर यांस स्वतः कांहीं सामर्थ्य नाहीं. स्नेही मंडळींचें ही ह्मणणें कीं दुष्काळ संपला व आतां मदतीचें कारण नाहीं. हीं मुलें कोठें पांच, कोठें चार, कोठें दहा," अशीं ठिकठिकाणीं त्यांच्या त्यांच्या जाती प्रमाणें ठेविलीं आहेत. आतां मुलांच्या आई बापास अगर आप्तवर्गास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं ज्यांनी त्यांनीं आपआपलीं मुलें या सप्तंबर अखेरचे आंत न्यावीं. नाहीं तर, मुलें ज्या जातीचीं असतील त्या जातीच्या लोकांस वाटून टाकूं किंवा मोरवी संस्थानचे ठाकूर साहेब मुलें पोसण्या करितां मागत आहेत त्यांचे कडेस देऊं.

इतर लोकांस वरील नोटीसी वरून कळून येईल कीं मजकडे ७८१ अनाथ मुलें आहेत तर तीं मुलें त्यांचें वारसानें सप्टेंबर अखेर नेलीं नाहींत तर तीं मुलें पोषण्यासाठीं खालील शर्तीवर द्यावयाचीं आहेत करितां मुलें बाळगण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आमचे कडे पत्रव्यवहार करावा.

१ मुलांची जात किंवा धर्म भ्रष्ट होता कामा नये.

२ मुलांचे योग्य वारस मागू लागल्यास त्यांस हरकत न दाखवितां तुह्मी ज्या माजिस्त्रेटाच्या हद्दींत असाल त्या माजिस्त्रेट मार्फत द्यावींत सदरहु मुलांस कोणी मागता नच येईल तर मुलांचें लग्न त्यांचे जातीमध्यें केलें पाहिजे. मुलें गुलामगिरीसाठीं द्यावयाचीं नाहींत. योग्य शिक्षण दिलें पाहिजे हें निराळें सांगणें नको.

३. नऊ ब्राह्मणांच्या मुली आहेत.

४. पत्रव्यहवार करणारानें आपली जात व ठिकाण हीं स्पष्ट कळवावीं. ह्मणजे त्याचे जाती बद्दल तपास करून निकाल कळवूं.

५. मुलें मागणारा हिंदु असला पाहिजे.

६. मुसलमानांचीं कांहीं मुलें आहेत तीं मुसलमान लोकांस वर लिहिले शर्ती प्रमाणें देण्यांत येतील.

मुलें बाळगण्यास देण्याचे ठरल्यास ज्या माजिस्त्रेटाच्या हद्दींत मागणारा असेल त्या माजिस्त्रेट किंवा जिल्ह्याचा कलेक्टर मार्फत देण्यांत येतील. मुलें असतील त्या ठिकाणीं जाऊन आणावीं लागतील.

तुर्त मुलें मागणारांचीं नांवें नोंदून ठेऊं मुलांचे वारसां कडील निकाल कळून मुलें शिलक राहातील तीं कळवूं.

हिंदुच्या १३० विधवा आहेत. कोणी हिंदु त्यांचें साठीं सदन उघडतील काय ?

विधवा स्त्रिया आहेत त्या वाईट कामासाठीं अगर पुनर्विवाहासाठीं अथवा मुलांचें लालनपालन करण्यासाठीं देण्याच्या नाहींत, पंडिता रमाबाईचें शारदासदन आहे त्याप्रमाणें

कोणा हिंदूस लाज वाटून उघडतील तर देण्याच्या आहेत.

---

हैदराबादेस यवनी राज्य असूनही तेथें गेल्या महिन्यांत श्री गणपतीचे सार्वजनिक महोत्सव नऊ दहा ठिकाणीं मोठ नामी झाले मेळे व मिरवणुकी चांगल्या प्रेक्षणीय होत्या. हिंदु लोक जसे ताबुदाच्या आनंदोत्सवांत मिसळतात त्याप्रमाणें मुसलमान लोक ही मोठ्या प्रेमानें व भाविकपणानें या सार्वजनिक उत्सवांला जात येत होते हें ध्यानांत धरण्या सारखें आहेत. हैदराबाद येथील पीलखाना, शालीबांड, नामपल्ली, हरी बावडी, उमरा बाजार व चंद्रघाट येथील मुख्य मुख्य उत्सव अत्यंत आल्हादकारक झाले. रा. रा. शंकर कल्याण देशपांडे पुसदकर यांनीं पिलखान्यांतील उत्सवाची देखरेख स्वतां चांगली ठेविली होती. चार पांच व्याख्यानें विद्वान लोकांनीं इंग्रजी व संस्कृत भाषांत दिलीं. सालोसाल हे सार्वजनिक उत्सव चांगल्या भरभराटीला येतें जातील असा अंदाज आहे.

---

मुंबई इलाख्यांत प्लेगचा तडाखा चालूंच आहे आणि ज्या ठिकाणीं प्लेगचा आजार नाहींसा होत चालला होता तेथें पुन्हा सुरूं झाला आहे. प्लेगा संबंधानें धरबंधच नाहीं. तो केव्हां व कोठें उद्भवेल याचा कांहीं नेम नाहीं. क्वारंटाईन वगैरे सरकारचे बंदोबस्त लटके ठरले आणि लोकांचा छळ मात्र फार होत असतो. या बंदोबस्ताच्या पायीं सरकारचा हेतु चांगला असूनही लोकांचीं मनें बिथरलीं. बंदोबस्ताचा भयंकर तडाखा कसा असतो यांचे ताजें उदाहरण धारवाड्यास अगदीं नव्यानें नुकतेंच अनुभवाला आलें तेथील राजश्री हयग्रीवाचार्य नांवाच्या ब्राह्मणाच्या घरीं ११ वे तारखेला एक प्लेग केस झाली त्या बरोबर सरकारी व्यवस्था सुरूं झाली. त्याच्या घरीं बायको एक महिन्याची बाळंतीण होती व बापाचा पक्ष होता, असें असून भंग्याकडून घर धुवविलें ह्मणून रागाच्या व दुःखाच्या भरांत त्यानें आत्महत्या करून घेतली. गरीब बिचारा! त्यांनें कलेक्टराला एक बाळबोधींत पत्र लिहिलें आहे ते प्रसिद्ध होऊं [illegible]त नाहींत. कलेक्टरानें लपंडाव पुष्कळ केला पण 'कालिदास' कर्ते राजश्री गुरुजी व कांहीं मुनिसिपल मेंबर यांनीं त्या प्रकरणांत नेट धरला आहे. ईश्वर करो आणि सरकारी बंदोबस्ताची प्लेग तरी बंद होवो!

---

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं नामदार न्यायमूर्ती फ्यारन, मुंबई हायकोर्टाचे चीफजस्टिस यांस गेल्या १० वे तारखेला मुंबईस देवाज्ञा झाली. नामदार मरणापूर्वीं पंधरा दिवस मूत्रकृच्छ्राच्या रोगानें अगदीं हैराण होऊन आपल्या वयाचे ५७ वे वर्षीं मरण पावले. यांनीं बारिस्टरचें कामही पुष्कळ वर्षें केलें होतें. १८९५ जूलै १ पासून हे चीफ जस्टीस होते. मुंबई इलाख्यांत हे सुप्रसिद्ध होते. यांची विद्वत्ता मोठी असून न्यायाच्या कामांत अगदी निष्पक्षपाती, होते. न्यायाचें काम लवकर करण्याकडे त्यांचा विशेष रोख होता. आणि कोणाची भीड किंवा भिती बाळगत नव्हते. त्यांचे ठराव त्यांच्या न्यायबुद्धीची व विलक्षण विद्वत्तेची जगास साक्ष देतील. नामदार फ्यारन साहेबांत अप्रतिम गुण ह्मणजे त्यांचें सौजन्य होय. त्यांचें वर्तन सरळ व गोड असे. नामदार साहेबांच्या चरित्रा पासून सौजन्याचा धडा न्यायाधीशाच्या आसनावर बसणारे पुष्कळ अरेरात्र यत्किंचित् तरी घेतील तर त्या मृत महात्म्याचे जगावर मरणानंतरही अत्यंत उपकार होतील.

---

सरदार दयालसिंग हें नांव लाहोरच्या राष्ट्रीय सभे पासून सर्वत्र महशूर आहे. १८९३ त मि० दादाभाई नवरोजी यांच्या अध्यक्षते खालीं ही सभा भरली होती तेव्हा हे गृहस्थ स्वागत-मंडळीचे अध्यक्ष होते. त्यांचे त्या वेळेंचे वीरश्रीचें भाषण बहुतेकांच्या ध्यानात असेलच. लाहोरच्या 'ट्रिब्युन' पत्राची मालकी यांच्याकडेस होती. शिख लोकांत नांवाजलेले असे गृहस्थ सरदार दयालसिंग यांस त्यांच्या वयाचे ५० वे वर्षीं नुकतीच देवाज्ञा झाली हें कळविण्यास दुःख वाटतें. सरदार बहादुराचें घराणें इतिहासांत प्रसिद्ध आहे. आणि त्यांचे आजे खुद्द श्रीमंत रणजितसिंग महाराज यांच्या पदरीं मुत्सदी होते. पंजाबांतील नामांकित नररत्न काळानें हिराऊन नेलें त्यापुढें इलाज नाहीं!

---

स्थानिकस्वराज्यावर सरकारची वक्रदृष्टी आहे. कांहीं वर्षापूर्वीं सर्वत्र मुनसिपालिट्यांचा जयघोष ऐकूं येत होता आणि लार्ड रिपन शाहीची उदार देणगी इंडियांत चिरकाल वृद्धिंगत होत जाईल अशी आशा होती. पण अलिकडे एक विलक्षण विघ्न उपस्थित झालें आहे. सरकारास राजद्रोहाचे तुषार वातावरणांत लटकेच भासतात. ह्यामुळें प्रजेविषयीं विश्वास न वाटतां तो कमी झाला आहे. त्याचा परिणाम असा कीं सर्व राजनीति अनुदारपणाची होत आहे. लोकांचें प्राबल्य मुनसिपालिटींतही नसावें असा सरकारचा मानस दिसतो. कलकत्ता मुनसिपालिटीमार्गें लोक प्रतिनिधींची संख्या कमी करण्याचा व सरकारी सभासदांची संख्या वाढविण्याचा ससेमिरा लागूं केलाच आहे. पुण्याच्या मुनसिपालिटीची आख्या चांगली होती पण तिच्यांत देखील सरकारचें प्राबल्य फार वाढविणार आहेत. स्थानिक स्वराज्याच्या धर्तीवर वऱ्हाड प्रांतातही मुनसिपालिट्या चालविल्या आहेत. परंतु आतां नवी वाटाघाट अशी चालू आहे. कीं लोकांच्या निवडणुकीचे सभासद कमी करून सरकार तर्फे नेमलेले सभासद अधीक असावेत. नवीन दिशा दडपशाहीची आहे तेव्हां वादविवाद वायफळ होय. मूळ राजनीतीचें धोरण बदलेल अशा विषयीं सरकारा पाशीं दाद मागितली पाहिजे. वऱ्हाड प्रांतीं मुनसिपालिटीच्या लोकसंस्था सर्वस्वी सरकारच्या दाबांत पूर्ण पणें आहेत तरी देखील लोकांचा नामशेष निवडणुकीचा हक्क पुष्कळसा सरकार काढून घेत आहे हें तत्वदृष्ट्या वाईट होय.

---

# The Berar Samachar

**MONDAY, SEPTEMBER 19 1898**

Mr. Tilak's case is a typical illustration of the policy of coercion. During the last quarter of the century, imperialism paved its zigzag way against all odds of the liberal viceroys like Lord Canning Mayo and Ripon. In the history of India the last year was an epoch—making year when the wave of imperialism reached its highest water—mark. The Government raked up the whole machinery of laws and regulations to achieve an ignoble point. The aim was to lop off the tall poppies or rather to prosecute the people's leaders in order to make an example of them to the rest of the nation. All people could realize the giagantic power of the Government. The prestige of striking terrors into the hearts of loyal Indian subjects was firmly established. The moral runs however in another direction. The difficulties of India thicken and multiply when the British rule triumphs in the imperialism of the day. They magnify the proportions of injustice done towards India and give rise to the growing sense of unity in the minds of the people. In the words of Mr. Anand Mohan Bose, a feeling of a common sentiment of patriotism, of common ties of fellow—citizenship and a common allegiance of countrymen rules supreme in every Indian heart. Herein we see the foot—prints of the mending process of welding all people into one nationality At such trials and troubles, loyalty to the throne waxes along with the out—bust of a patrioti fire. The imperial influenza which appeared in the Diamond Jubilee-year will soon disappear with the return to good old feelings of sympathy and liberal principles. The unifying causes are at work and this feeling of brotherhood will explain the national rejoicings over the release of Mr. Tilak: The English people are righteous and truth-loving though they are rather slow and stubborn. We shall have to knock at the doors of the British Parliament until we get our grievances redressed and our privileges extended to us in a full measure. Our highest ideal is to rise to the franchises of a British subject.

---

The Hindu of Madras has an able and learned article on the present phase of the British rule in India. Certain arguments of the London Spectator have been refuted in a lucid manner to prove that the British democracy is getting worse and worse in so far as the administration of India is concerned. We give below some extracts from the same piece with a view to explain how the present policy evolves out of the main characteristics of the British rule during the last 20 years:—

"All the great political privileges extended to the Indian people, or most of them, date anterior to this period, whereas during this period we have had from time to time, with short interruption, attempts to curb or whittle down these privileges, to impose unjust burdens on the country, and to deprive her trade of the legitimate safe-guards against foreign competition, which every other Government under the sun—except Great Britain which is exceptionally situated-including the British Colonies, think it their duty to afford to their own industries. Nor is it true that the British people have themselves morally improved by the possession of Empire and the exercise of imperial powers. The Imperialism that is sweeping over the land to-day cannot be classed in the same moral category as the righteous wrath which freed the slaves, which sent Howard on his mission to prisons, and which inspired the eloquence of Fox and Burke. "Of course if the nation instead of treating its empire as a trust, treats it as a place out of which to make money, empire will demoralise it. If, however, it assumes empire as a duty and responsibility, it may gain immensely in moral stature and strength."

There is the "plantation" theory, according to which tropical territory is simply an estate "to be worked for the largest profit it will bring in." The second method rests on the assumption that just as England has colonised the temperate regions of the earth, so other European nations can colonise the tropics. Both these methods Mr. Kidd rejects, the latter as involving the acclimatisation of the white man to tropical conditions—an idea, he says, which has probably led to "more physical and moral suffering and degradation" than any other which can be named. "The third method," writes the *Spectator*, "is the English plan, which differs from the first in that it dismisses altogether the idea of working the territory for the exclusive benefit of its white possessors, and from the second in that it contemplates the development of the tropical countries under native direction, the Power which represents civilisation being there only temporarily. *This was the conception of the tropics which prevailed in England in the middle of this century. Of late we have come to see thas this too is a mistake.* The tropics and the tropical races are no field for democratic experiments."

The administration of a country by officials who are merely "birds of passage" is from the economic stand point a disastrous anomaly. Their interest in their work is but temporary. The frequent renewal of their contact with the conditions of European life, while it benefits them personally in one way, unfits them for the task of administering alien peoples in another. They become haughty, overbearing and unsympathetic. It is therefore, of vital importance. as Mr. Kidd observes, that their acts should be subject to continuous scrutiny by the governing race, to protect the subject people from oppression."

---

## वऱ्हाड

हवामान— पाऊस बरा झाला. सध्यां चांगली उघाडी आहे. एकंदर पाऊस १८ इंच झाला. रोगराई ह्मणण्या सारखी कांहींच नाहीं. बाजारभाव मंदीचे आहेत.

बुलडाणा— 'क्ष' सार्वजनिक गणेश महोत्सवाची आपली हकीकत आनंदकारक आहे पण उशीरा आली. बुलढाण्या गांवांत तसला समारंभ अपूर्वच होय.

अलिशान रेसिडेंट सर प्लैडन हे येत्या नोवेंबरच्या पहिल्या आटवड्यांत रजेवरून परत येतील.

---

## वर्तमानसार

विलायतची ६ वी तार सांगत्ये कीं, पराजांच्या आरमार आफीसरांनीं ठरविल्या प्रमाणें कांडिया येथील टिथ आफीसाचा चार्ज ता० ६ रोजीं इंग्रजांनीं घेतला.

इंग्रजांच्या या चार्ज घेण्यास मुसलमानलोक हरकत करूं लागले. दंगा सुरूं झाला तेव्हां इंग्रज शिपायांनीं बंदुका चालू केल्या व पुष्कळ लोकांस जखमी केलें.

मुसलमानलोक अगदीं चवताळले आणि त्यांनीं ख्रिस्ती लोक राहात असलेल्या मोहोल्यास आग लाऊन दिली. या आळींत इंग्रज वकील व त्याचे शिबंदीलोक आणि दुसरे पुष्कळ ख्रिस्ती ठार झाले अशी बोलवा आहे.

शहराचा एक भाग पेटत असतां लढाऊ गलबतांनीं त्या शहरावर तोंफांचा भडमिार केला.

दुसरीं लढाऊ गलबतें कांडिया येथें घाईनें जात आहे.

शहरावर तोफांचा जो भडीमार केला तो हानर्ड नांवाच्या इंग्रजी गलबतानें केला.

पुन्हा ७ वी तार सांगत्ये कीं, काल कांडियांतल्या मुसल्मानांनीं आपापल्या घरांतून जो एकदम मारा सुरू केला त्यांत इग्रजांचे २० शिपाई ठार झाले व ५० जखमी झाले.

इंग्रजांचा व्हाइस कान्सल ह्मणजे असि० राजकीय वकील हा आपल्या राहात्या घरांतच जळून मेला आणि त्याचप्रमाणें दुसरेही कित्येक ख्रिस्ती लोक जळून मेले असावे असें वाटतें.

परराजांचींही कित्येक लढाऊ गलबतें कांडिया येथें दाखल झालीं.

पुन्हा ८ वी तार सांगत्ये कीं, माल्टा येथें असलेल्या एका इंग्रजी पलटणीच्या २ कंपन्या क्रीट येथें गेल्या.

कांडियाच्या वरील दंग्यात ले० हालडन ठार झाला व ले० सेग्रव घायाळ झाला.

लढाऊ गलबतावरचे कांहीं शिपाई कांडियाच्या बंदरांत उतरले.

शहराच्या बंदोबस्ताकरितां असलेल्य टर्कीच्या लश्करी लोकांनीं इंग्रजांस मदत करण्याचें नाकारलें आणि दंगेखोरांस शासन करून शांत करणें माझ्या शक्तीच्या बाहेर आहे असें तेथील गव्हरनराचें ह्मणणें आहे.

सगळ्या डिस्त्रिक्टभर चळवळ सुरू झाली आहे.

कांडियांच्या दंग्यांत एकंदर ३०० लोक ठार झाले. टर्कीच्या लश्करी लोकांनीं इंग्रजावर गोळ्या घातल्या असें सांगतात. शत्रूचे हजारों मेले व जखमी झाले.

इजिप्तचा राज्यकारभार आज बहुत्येक इंग्रजांच्या ताब्यांत आहे हें प्रसिद्धच आहे. इजिप्तच्या राजाचे कांहीं शत्रू असून त्यांच्यावर इजिप्तची ह्मणजे इंग्रजांची एक फौज रवाना झालेली आहे हेंही प्रसिद्ध आहे. जनरल किचनर हा इंग्रजी फौजेचा मुख्य आहे. त्याकडून आलेल्या तारेवरून समजतें कीं,:—

नीलनदीचा सारा किनारा इंग्रजी बोटांनीं साफ केला. ओमदरमनच्या समूरच्या तुती बेटातले किल्ले वगैरे साफ पाडून टाकले.

ओडरमन येथील माधीच्या मशिदीचे घुमट पाडून शत्रूच्या चार तोफा घेतल्या.

केररी येथें जाऊन दरवेशांस पळवून लावलें.

शत्रु खलिफा हा ३९,००० फौजेसह लढाईस तयार झाला.

मागच्या शुक्रवारीं या फौजेशीं इंग्रजी फौजेची पाच तास कडक लढाई झाली. खलिफाच्या फौजेस हाकून लाऊन आमडरमन ठिकाण सर केलें.

रिसाल्यानें खलिपाचा पाठलाग केला.

यांत इंग्रजांचें १०० लोक जाया झाले व इजिप्तचे २० जाया झाले. शत्रूचे किती नुकसान झालें तें समजलें नाहीं. एक लेफटनेन्ट व एक क्यापटन असे इंग्रजांचे २ हपीसर ठार झाले. २१ साव्या गोऱ्या पलटणीतले २१ मेले व ९० जखमी झाले.

शत्रू दरवेशी यांच्या फौजेंत खलिफा मुख्य असून त्यांचें फार नुकसान झालें व त्यास पळ काढावा लागला.

कर्नल ऱ्होड जखमी झाला, दरवेशी अगदीं निकरानें तुटून पडले व त्यामुळें त्यांचे हजारों जाया झाले.

खलिफाचा स्वताचा वावटा घेतला. खलिफाची बाकीची फौज शरण आली व ते आतां कैदेंत आहेत.

ओमडरमन येथें फारच गलिच्छपणा असल्यामुळें तेथें राहणें सोईचें नाहीं असें झालें आहे.

जनरल किचनर हा खारटूम येथें जाऊन आला व तेथें त्याचा फार मोठा जयजयकार झाला. हें शहर अगदीं उध्वस्त झालें तरी लश्करी दृष्टीनें त्याची ठेवण ओमडरमनपेक्षां चांगली आहे.

अर्ल आफ कार्लिसल यांचा मुलगा आनरेबल होवर्ड व टाइम्स पत्राचा बातमीदार हे ओमडरमनच्या लढाईत ठार झाले.

ताजी बातमी सांगत्ये कीं, या लढाईंत इंग्रजांचे नन कमिशन्ड आफीसर व शिपायी मिळून २३ ठार झाले व ९९ घायाळ झाले. इजिप्तचे २१ मेले व १३० जखमी झाले.

शत्रूचे १६००० जाया झाले.

इंग्रजांच्या रिसाल्यानें खलिफाची पाठलाग करण्यांत सारखी ४८ तास दवड केली.

खलिफा स्वता १३० लोकांसह कोर्डफन येथें पळून गेला.

रविवारीं खारटूमच्या राजवाड्यावर इंग्रजांचा बावटा लागला व जनरल गार्डनच्या मृत्युबद्दल दुखवटा केला.

या ओमडरमनच्या लढाईत दरवेशांचे १०,८०० लोक ठार झाले व १६,००० घायाळ झाले आणि ३,००० पासून ४००० पर्यंत कैद केले असें इंग्रज आफीसर जनरल किचनर सांगतात. टा० अ०

आमच्यांतलीं तरुणपणीं प्रसिद्धीस आलेलीं माणसें—शंकराचार्य-यांनीं दहाव्या वर्षीं षोडश भाष्यांचें प्रणयन करून एकुणिसाव्या वर्षीं दिग्विजय केला.

अप्पया दीक्षित-आपल्या बाराव्या वर्षीं वेदाध्यन संपवून शास्त्राभ्यासास लागला.

ज्ञानेश्वर-ज्ञानेश्वरी सारखा वेदांत विषयक ग्रंथ यानें आपल्या वयाच्या १९ व्या वर्षीं संपूर्ण केला.

एकनाथ-भागवतावरील महाराष्ट्र टीका यानें आपल्या पंचविसाव्या वर्षीं लिहिली.

रामदास-लग्न न लाविता आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याचा निश्चय करून या राजगुरूनें आपल्या वयाच्या बाराव्या वर्षीं पुरश्चरणास आरंभ केला.

शिवाजी महाराज-यांनीं तोरणा किल्ला आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं सर करून त्यावर आपलें भगवें निशाण लावलें व मराठी राज्याचा पाया घातला.

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे-यांनीं २१ व्या वर्षीं तुळाजी आंग्र्याचावर स्वारी करून त्याचा पराभव केला.

थोरले माधवराव पेशवे-यांनीं आपल्या १९ व्या वर्षीं स्वतः सेनानायकत्व पत्करून राक्षसभुवनच्या लढाईत विठ्ठल सुंदरास ठार मारून निजाम अल्लीचा मोड केला.

बापू गोखले-यांनीं आपल्या वयाच्या चवदाव्या वर्षीं स्वतः आपल्या पदकाचें नायकत्व पत्करून, सावनूरकरांचा मोड केला व या कामगिरीबद्दल जुन्नर तालुक्यांतील कोरेगांव इनाम मिळाविलें.

राममोहनराय-यानें आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत इंग्रजी, बंगाली, आरबी, फारशी आणि संस्कृत इतक्या भाषाचा अभ्यास करून, मूर्तिपूजेविरुद्ध एक ग्रंथ प्रसिद्ध केला.

सर. टी. माधवराव-आपल्या वयाच्या अठराव्या वर्षीं मद्रासच्या कालेजांत गणित आणि पदार्थविज्ञानशास्त्राचे हे प्रोफेसर झाले. त्यास याच वर्षीं प्रो. पॉवेल यानें असा दाखला दिला होता कीं, " गणित आणि पदार्थविज्ञान शास्त्रांत केंब्रिजच्या विश्वविद्यालयांत देखील यांचा बहुमान होईल.

सुरेंद्रनाथ-हे एकविसाव्या वर्षीं बी. ए. च्या परीक्षे नंतर सिव्हिल सर्विस झाले.

न्या. बद्रुद्दीन तयबजी- हिंदुस्थानी, फारशी व इंग्रजी भाषेचा बराच अभ्यास करून हे सोळाव्या वर्षीं विलायतेस गेले.

पंडित गट्टूलालजी—आपल्या नवव्या वर्षीं संस्कृत कविता करूं लागले व यांना वयाच्या बाराव्या किंवा तेराव्या वर्षीं रुक्मिणी चंपू नामक आपला पहिला ग्रंथ लिहिला.

केरूनाना छत्रे—यांनीं सोळाव्या वर्षीं एल्फिन्स्टन कॉलेजांतील एका परीक्षेंत पदक बक्षीस मिळवून अभ्यासक्रम सोडला.

खरी सभ्यता फारच थोड्या लोकांच्या अंगीं असते. सभ्यता ही पोषाखांत नाहीं, भाषणांत नाहीं, पण ती मनुष्याच्या वर्तनावरून दिसून येते. सभ्य पोषाख व सभ्य भाषण हे दोन अंगच्या खऱ्या सभ्यपणाचे बाहेरचे दोन अलंकार होत. आचरण जर अगदीं चोख सभ्य रीतीचें असेल तर हें अलंकार त्यास शोभा देतात, नाहीं तर ढोंगे सभ्यपणाचा दोषारोप केल्याखेरीज सज्जन लोक कधींही रहावयाचें नाहींत. मनुष्याचें खरें आचरण नुसतें त्याच्या भाषणाच्या सफाईवरून किंवा त्याच्या कपड्यालत्त्याच्या छानछुकीवरून शद्ध व निर्मळ आहे असें एकदम विधान केल्यास तें निरीक्षणाअंतीं बहुधा चुकीचें ठरतें. मनुष्याचें शुद्ध व निर्मळ वर्तन हें सूक्ष्म पण सरळ दृष्टीनेंच पाहिलेंच असतां समजून येणारें आहे. कोणताही समाज घेतला तरी त्यांत खरी सभ्यता सांपडणें फारच कठीण आहे. खरी सभ्यता अंगीं येण्याला मनावर चांगल्या सुविद्येचाच परिणाम झाला पाहिजे. खऱ्या सभ्पणाचें मुख्य गुण ह्मटले ह्मणजे अंगीं दयालुता, सत्यप्रिती सुजनता, परोपकृतिता, शालीनता व सहिष्णुता वगैरे गुण अगदीं मूर्तिमंत एकवटून गेले पाहिजेत. जो ह्मणून या गुणांनीं युक्त तोच सभ्यतेच्या पदाला योग्य. व खरा वंदनीय सभ्य पुरुष तोच. जगाच्या विविध जातीच्या व्यवहारांत ज्याचें लक्ष्य पूर्ण गढून गेलेलें असतें, त्यानें जरी सभ्यपणाचा आव घातला तरी त्याची ती सभ्यता मृगजळवत् दुरून दिसायला मात्र असते. वस्तुतः त्याच्या ठिकाणीं सर्व भास असतो.

जपानांतले डाक्टर लोक औषधाचें बील आपल्या रोग्याकडे आपण होऊन कधीं पाठवीत नाहींत. रोगीच जेव्हां त्यांच्याकडे औषधाचे पैसे घेऊन जाईल तेव्हांच ते घेतात. त्याचा औषधाचा दर ठरावीक असा मुळींच नाहीं. रोगी जे पैसे देईल तेवढेच ते आनंदानें घेतात.

एका प्राणीशास्त्रवेत्त्यानें असें शोधून काढलें आहे कीं, निळ्या रंगाच्या डोळ्याचीं मांजरें बहुतकरून बहिरीं असतात.

सगळ्या जगाच्या लोक संख्येंत आंधळ्यांची संख्या बहुतकरून एक लक्षाहून अधिक नसावी.

वीस वर्षांच्या आंत ज्या स्त्रियांना मुलें होतात तीं फार करून निरोगी थोडीं असतात. पंचवीस पासून तीस वर्षांच्या वयाच्या दरम्यान जें मूल होतें तें चांगलें निरोगी असतें.

रॉकेल तेलाच्या दिव्यानें नुसत्या लंडन शहरांत दरसाल सुमारें तीनशें अपघात होतात. करमणूक.

निझाम व त्यांचे दिवाण यांचे पटत नाहीं असें सांगतात. दिवाण साहेब हिंदुस्थान सरकारच्या हिमायतीचें असल्यामुळें हा असा प्रकार होत असावा असें लोकांचें अनुमान आहे. असें सांगतात कीं, निझाम साहेबांच्या वाढदिवसाचा नुकताच एक मोठा समारंभ झाला. पण त्यांत दिवाण साहेब कोठेंही नव्हते. खरें असेल तर कांहीं नवल नाहीं. आजचे निझाम १०० वर्षांच्या पूर्वींचे असते तर त्यांचे दिवाणही त्यांच्या ताब्यांत असते, पण आजचे निझाम स्वतांच जर स्वताच्या ताब्यांत नाहींत तर त्यांचे दिवाणांनीं तरी त्यांच्या ताब्यांत कां राहावें? पण काय हो, निझामाच्या दिवाणाची नेमणूक हिंदुस्थान सरकार करतें कीं काय?

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके, यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ८१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....८१

Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy ............................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXII — AKOLA MONDAY 26 SEPTEMBER 1898 — NO 38

वर्ष ३२ — आकोला सोमवार तारीख २६ माहे सप्टबर सन १८९८ इ० — अंक ३८

## जाहिरात

मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याचा बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटींवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागे त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ — A. G. Watsou out.

## नोटीस

बनी मर्द गोविंदा शिंपी राहणार शहर आकोला. इला.

या लेखानें कळविण्यांत येते कीं तूं भावाच्या व इतरांच्या फंदानें मला २६।९।९८ च्या शुद्धवऱ्हाडी पत्रांतून खोटी जाहिर नोटीस दिलीस हें गैर केलेस. ही नोटीस पोचतांच तीन दिवसांचे आंत पातुरास घरीं येऊन संसार करूं लागावें. तूं आपल्या आजीच्या मरणामुळें माहेरी गेलीस आणि लबाडीनें माझ्या इच्छेविरुद्ध भावाच्या घरीं राहिलीस. पंचांनीं विनंती केली ती नको होती. तुला माझ्या घरीं येण्याला कोणाचा मज्जाव नव्हता.

दुसऱ्याच्या फितुरीनें २०० रुपये किंमतीचे दागिन्यांची अफरातफर केलीस. आणि २०० रुपये कर्ज काढल्याचें देखील ढोंगसोंग केलें आहेस. कर्ज काढण्याला व दागिने मोडण्याला कारण नव्हतें. भाऊ भिकारी होता तर त्याच्या घरीं राहण्याचें नव्हतें. तूं वर दिलेल्या मुदतींत न येशील तर कोर्ट मार्फत तुझा ताबा घेईन आणि दागिने न आणशील तर तुझ्या भावावर फिर्याद करून सर्व रक्कम नोटीशीचे खर्चासह भरून घेतली जाईल. सावकारानें माझ्यावर फिर्याद केली ह्मणजे मग मी सर्व गोष्टी पाहून घेईन. कळावें. तारीख २१ सपटेंबर १८९८ इसवी.

( सही )

गोविंदा रामु शिंपी राहणार पातूर दस्तुर खुद.

## अहल्याचरित काव्य

नंबर ५

जधीं कांहीं नेणें ह्मणुनि वदले पंडित मला।
तदा माझा गर्वज्वर सकलही हा उतरला॥

( ६ ) उपसंहार — वामन

मागील चार नंबर पावेतों रा. शेवडे यांचे अहल्या चरित काव्याचे काव्यपरीक्षणाचीं जेवढी ह्मणून मुख्य अंगें आहेत त्या सर्व च जूंनीं परीक्षण करून त्यांतील गोष्टींचें यथास्थितपणें विवेचन केलें आहे. आतां सदरील रसशून्य काव्याचे 'नेमस्त विचारी' नांव धारण करणारानें आपल्या उद्दीन तद्दीन अशा निरानिराळ्या गतींचे साहाय्यानें मागील कांहीं अंकीं दोषखंडन करण्याचा जो प्रयत्न केला आहे त्यांतील मथितार्थ वाचकांचे नजरेस आणून प्रस्तुत टीका संपवावयाची आहे. ज्या दोषांमुळें रा. शेवडे यांचें काव्य सदोष ठरविलें गेलें आहे ते दोष एक दोन प्रकारचे नसून अनेक तऱ्हेचे आहेत हें वाचकांस माहीत आहेच. नेमस्त विचारी यानें ह्या सर्व अथवा यांतील कांहीं दोषांचा उघडपणें निर्देश करून प्रतिकार न करितां नुसत्या ब्रह्मज्ञानाच्या कोरड्या गोष्टींनींच वाचकांवर भुरळ पाडण्याचा प्रयत्न केला आहे. दोषखंडन करण्याचें जसें त्यास उघडपणें धैर्य झालें नाहीं तसें "काव्य चांगलें साधलें आहे" इत्यादि पोकळ विधानाचें मंडन करण्यास त्यास हिंमत झाली नाहीं. वास्तविकपणें पाहतां सदरील काव्यांत जें कांहीं चांगलें साधलें आहे ह्मणून त्यास वाटलें त्याचे थोडे थोडके मासले वाचकापुढें मांडणें हें त्याचें निदान अवश्यमेव कर्तव्यकर्म होतें परंतु त्यांसही त्यानें पराङ्मुखता दाखविली आहे. दुसऱ्याचे उसणवार शस्त्र घेऊन कज्जास उभा राहणारा गृहस्थ स्वतःचें शस्त्र असल्यावर छपवून ठेवील असा प्रकार घडणें नाहीं. नेमस्त विचारी यानें दुसऱ्याचे उष्टे विचार घेऊन जर एवढें अकांडतांडव माजविलें आहे तर तो स्वतः जवळ तशीं कांहीं साधनें असतां गप्प बसेल अशी गोष्ट मुळींच अशक्य होय. असो, अहल्याचरित काव्याचा मोठा जो ग्राम्यतेचा दोष त्या संबंधानें नेमस्त विचारी यानें रा. कुंटे यांचे प्रस्तावनेकडें बोट दाखविलें आहे. व ही प्रस्तावना त्यानें आपले सर्व लेखास एक आधारस्तंभ करून ठेविली आहे. रा. कुंटे यांनीं आपल्या राजा शिवाजी काव्याच प्रस्तावनेंत काव्यरचने संबंधानें जीं मतें दिलीं आहेत तीं कवितेची उत्पत्ति मनुष्याच्या ज्या नैसर्गिक प्रवृत्तिपासून आहे तिशीं किती संबद्ध आहेत, हीं मतें अनुकरणीय मानलीं असतां न्यायमूर्ति रानड्या सारख्या विद्वन्मुकुटमणींनें ही प्राचीन कवींचीच महती वर्णन करून त्यांचेंच अनुकरण करण्याविषयीं आधुनिक तरुण मंडळीस उपदेश कां करावा, इंग्रजी भाषेमध्यें मिल्टन सारख्या कवीनें ल्याटीन भाषेंतील प्रयोग आपल्या Paradise Lost सारख्या काव्यांत घालून इंग्लिश भाषेला प्रौढी आणल्याबद्दल ॲडिसन सारख्या नामांकित निबंधकारानें त्यांचें अभिनंदन करावें व तेंच आमच्या वामनपंडित, मोरोपंत वगैरे महाराष्ट्र कवींनीं आपल्या काव्यांत संस्कृत प्रयोग घालून भाषेस मोठेपणा आणल्य बद्दल रा. कुंट्या सारख्या एका व्यक्तिविषयक आधुनिक सदय कवींचेंच माथें कां फिरून जावें व त्यांस शिव्या देण्या इतकी मराठी भाषेविषयीं त्यांचे मनांत अनुकंपा कां उत्पन्न व्हावी वगैरे प्रश्नांचा ऊहापोह करण्याचा प्रस्तुत समय नसून केवळ रा. कुंटे यांनीं घातलेला कित्ता रा. शेवडे यांनीं गिरविला आहे असें नेमस्त विचारी यांचें जें ह्मणणें आहे त्यांत सत्यतेचा तथ्यांश कितपत आहे हें पाहणें आहे. प्रथम नेमस्त विचारी यानें रा. कुंटे यांच्या राजा शिवाजी काव्याशीं रा. शेवडे यांच्या काव्याची साम्यता ज्या अर्थावर दाखविण्याची खटपट केली आहे तो त्याचा अर्थ अगदींच चुकीचा आहे. कारण कुंटे यांचे मतें काव्यांत संस्कृत शब्द घालून तें भारदस्त करण्याची खटपट करणें ह्मणजे 'भ्रष्ट' अभिरुचीचें निदर्शन करणें होय व रा० शेवडे यांनीं तर आपल्या प्रस्तावनेंत 'परंतु संस्कृताचें कांहीं मिश्रण असल्या वाचून काव्याच्या प्रौढपणास अथवा गांभीर्यास किंचित् न्यूनता येईल असें वाटतें' असें मत प्रदर्शित केलें आहे. यावरून कुंटे यांचे विचार रा. शेवडे यांच्या विचाराशीं विसंगत आहेत एवढेंच नाहीं तर कुंटे यांचे मतानुरूप रा. शेवडे कवि यांची आरंभींच "भ्रष्ट" वर्गांत गणना होते, असें सिद्ध झालें. यावरून नेमस्त विचारी ज्या पायावर आपले लेखांची इमारत रचिली आहे तो पायाच भ्रष्ट आहे हें वाचकांचे ध्यानीं येईल. दुसरें, कुंटे यांचें राजा शिवाजी काव्य "जेथें त्या अर्थाचा मराठी शब्द नसेल तेथेंच संस्कृत शब्द वापरावयाचा" अशा बाण्यानें लिहिलें गेलें आहे ह्मणून नेमस्त विचारी स्वतःच प्रतिपादितें आहे व रा. शेवडे यांचे काव्यांत तर ग्राम्य शब्दांबरोबर अमरकोश, कौमुदि उपनिषद [ मासल्या करितां काव्यांतील पहिलें 'नमन' पाहा ] हे जागजागीं नृत्य करित आहेत व यांचें तर कुंटे यांचे काव्यास वारें देखील लागू दिलें नाहीं एवढ्याच भेदावरून रा० शेवडे यांचें काव्य ग्राम्य कां ह्मणावें व कुंटे यांचे प्रस्तावनेंतील विचार रा० शेवडे यांचे काव्यास कसे लागू पडत नाहींत हें वाचकांचे ध्यानीं येईल. जर शुद्ध व्यावहारिक शब्दांतच काव्य रचलें रा० शेवडे यांस आवडत होतें तर काव्यांत अमर कोशाचें परिज्ञान दाखविण्याचा काय हेतू होता? तिसरें, नेमस्त विचारी याचे ह्मणण्या प्रमाणेंच रा. शेवडे यांनीं आपले काव्य रचतांना रा. कुंट्याच्याच काव्याचें अनुकरण केलें आहे असें घटकाभर गृहित धरलें तर व्याकरणाची ढोबळ अशुद्धता शब्दांची तिरस्करणीय विद्रुपता जी कुंटे यांस मुळींच खपत नाहीं धावळी, मुकटे यांचे अश्लील दृष्टांत, छंद भंग, शुद्ध मराठी काव्य रचण्याचा आव घालून अमरकोशाचे कानाकोपऱ्यांतील अप्रसिद्ध शब्दांची शुद्ध ग्राम्य शब्दांशीं सांगड इत्यादि दोषांविषयीं रा. शेवडे यांनीं कोणाचा अनुग्रह उचलला ह्मणोन ह्मणावयाचें? कुंट्यांचें काव्य या सर्व दोषांपासून जर अलिप्त आहे तर ग्राम्यतेचाच तेवढा दोष कुंट्यांच्या प्रस्तावनेंतील लांब लांब उतारे घेऊन व यांचा शुष्क काथ्याकूट करून कसा छपणार? कुंटे यांनीं आपल्या मतें काव्याची जी दिशा घालून दिली आहे ती बरहुकूम ( वरील दोष न करितां ) जर रा. शेवडे यांचें काव्य रचलें गेलें असतें तर नेमस्त विचारी यास आपल्या बाजूचे पुष्टीकरणार्थ कुंटे यांची प्रस्तावना विरेस घालतां आली असती परंतु रा. शेवडे यांचें काव्य धड हिंदूही नाहीं व धड मुसलमानही नाहीं तेव्हां अशा मानभावी काव्याचें एकपक्षीय विचारानें कसें मंडन होणार? चौथें, नेमस्त विचारी यांचे कुंटे यांच्याच केवळ प्रस्तावनेची कास धरून भागत आहे असें नाहीं. ग्राम्यतेचा दोष उडावा ह्मणून एक वेळ यास कुंट्यांचे प्रस्तावनेकडे जसें बोट दाखवावें लागत आहे तसें व्याकरणादि दोषा संबंधानें प्राचीन कवीकडेही त्यास बोट करावें लागत आहे. तसेंच मुकटे, कद, अथवा पुऱ्या यांचे दृष्टांता करितां "जुन्या धर्ती" कडे बोट दाखवावें लागत आहे. यावरून नेमस्त विचारी याचे तोंडानेंच उलट अर्थानें असें सिध्द होतें कीं आजपावेतों महाराष्ट्र भाषेंत जेवढे ह्मणून प्रख्यात कवि निर्माण झाले, जेवढीं आधुनिक विद्वानांचीं काव्यें वगैरे झालीं त्या सर्वांतील जेवढे ह्मणून दोष आहेत त्या सर्वांची रा. शेवडे यांनीं मोठ्या प्रयासानें 'अहल्या चारित्र काव्य' रूपी एक साधार दोषमय 'डिक्शरीच' बनविली आहे! कारण पुरातन महाराष्ट्र कवींचा अथवा कांहीं आधुनिक कवींचा त्यानें जो नाम निर्देश केला आहे तो केवळ रा० शेवडे यांनीं केलेल्या दोषांचें साम्य दाखविण्यापुरतांच असून ते दोष त्या कवींचे कोणते गुणाशी मिश्रित आहेत व ते गुण आपले काव्यांत यत्किंचित प्रमाणानें तरी प्रकाशमान झाले आहेत कीं कसे हें पाहण्याकडे बिलकूल नाहीं व असें त्यानें

आपल्ले एका लेखांत उघडपणें लिहिलेंही आहे. यावरून प्रस्तुत काव्यांत गुणाचा अभाव असून तें नुसत्या दोषांचे एक पेंवच बनविलें आहे हें नेमस्त विचारी याचे विचारावरूनच सिद्ध झालें. पाचवें, नेमस्त विचारी हा सदरील काव्यास ' जुन्या धर्तीचे ' सदरा खालीं लोटित आहे. ही जुनी धर्ती रामायण, इलियड वगैरे काव्यें रचलीं गेलीं त्यावेळेची किंवा ज्ञानेश्वर, मुकुंदराज यांचे वेळेची तें कळत नाहीं. कोणती ही वेळ गृहित धरली तरी त्या वेळेस, ताकपीठ, धावळी, मुकदे, अथवा बी शक्कर यांचे खमंग दृष्टांत प्रचलित होते असें निदान आमचे पाहण्यांत नाहीं. नेमस्त विचारी यानें तशा दृष्टांताचे कांहीं मासले जुन्या धर्तीचे ग्रंथांतून वाचकापुढें ठेविले असते तर वाचकांवर त्याचे मोठे उपकार झाले असते. साहावें, नेमस्त विचारी हा कित्येकास सदरील काव्य आवडणें अथवा न आवडणें हें रुचिवैचित्र्यावर अवलंबून आहे ह्मणोनही ह्मणत आहे. जगांत कोणास गोड आवडतें तर कोणास आंबट, कोणास तिखट असें भिन्न रुचीचे प्रकार आहेत खरे. तथापि नासका पदार्थ न आवडण्या विषयींची अभिरुचि सर्वांची एकच आहे. तसेंच काव्याचें आहे. नीरस अशुद्ध, व ग्राम्य अशी कविता कशाही अभिरुचीचे मनुष्यास कचितच आवडेल. या सर्व विचारावरून रा० शेवडे यांचें काव्य शुद्ध मराठी ह्मणजे कुंटे यांचे काव्या प्रमाणेंच केवळ व्यावहारिक शद्बांत रचलें गेलें आहे हें विधान निव्वळ मिथ्या असून त्यावरील ग्राम्यतेच्या दोषाचा आरोप सार्थ आहे हें वाचकांचे ध्यांनीं येईल. आतां जे दोष प्राचीन कवीचे काव्यांत कमजास्त प्रमाणानें आढळतात तेच आधुनिक कवींचे काव्यांत आढळल्यास ते अक्षम्य कां होतात हा एक प्रश्न आहे. मागील तिसऱ्या व चौथ्या नंबरचे टीकेंत प्राचीन व अर्वाचीन कवि यांत सहृदयतेचा केवढा मोठा भेद आहे व संपूर्ण रसवर्ग प्राचीन कवींचे स्वाधीन कसा हात जोडून उभा राहतो हें न्यायमूर्ति रानडे यांचे शद्बांनीं स्पष्ट केलेंच आहे. हेच गुण आधुनिक कवींचे काव्यांत पाहूं गेले तर त्यांत त्यांचा पूर्ण अभाव असून दोषांची मात्र चंगळ दृष्टीस पडते हें रा. शेवडे यांचे काव्यांतील उदाहरणा वरून मागें सिद्ध झालेंच आहे. ज्यास " कोरड्या भाता " पलीकडे कदन्नाचा स्वानुभव नाहीं, ज्यास धनसंचय करण्याच्या किमतीचें व्यवहारज्ञान नाहीं, " काकवी व तूप " या पदार्थांचे संग्रहावरून सार्वभौमत्वाच्या ऐश्वर्याचें उपलक्षण बांधण्याचें ज्याचें बुद्धिकौशल्य त्या महारसिक कवींचें काव्य वाचकास केवढा दिव्य आनंद देईल हें स्पष्ट शद्बांनीं व्यक्त करावयास पाहिजे असें नाहीं. तेव्हां अशा काव्यांतील दोष वाचकांस क्षम्य व्हावे किंवा अक्षम्य व्हावे याचा उलगडा नेमस्त विचारी यानें आपले मनाशींच करावा हें बरें. मृत्तिकेचा वर्ण कस्तुरीचे वर्णा प्रमाणेंच काळा आहे तेव्हां एवढ्यांच दोषाचे साम्यते वरून मृत्तिकेस जसें कस्तुरीचे मोल येत नाहीं तसेंच प्राचीन कवींच्या दोषांचें साम्य करून त्यांचें मोल आधुनिक कवीस कदापिही येणार नाहीं. ईश्वरानें घोडा व गाढव ह्या उभय प्राण्यास सारखींच इंद्रियें दिलीं आहेत व दोघांमध्यें ही लत्तापहार करण्याचा सारखाच दोष आहे. एवढ्याच दोषाचे साम्यतेवरून गाढवास घोडा ठरवूं पाहणें हा कोटिक्रम जितक्या शहाणपणाचा आहे तसाच गुणाकडे दृष्टी न देतां दोषाचे साम्यतेवरून प्रस्तुत काव्य प्राचीन कवींच्या काव्याचे पंक्तीस बसविण्याचा नेमस्त विचारी याचा कोटिक्रम होय. यावरून वस्तुमात्रांची परिक्षा गुणावरून करावी लागते, दोषांचे साम्यतेवरून नाहीं. हें तत्व नेमस्त विचारी यानें चांगले ध्यानांत वागवावें व जें काय लिहिणें तें नीट विचारानें लिहित जावें. असो.

हा वेळ पावेतो वाचकांस रा. शेवडे यांचे काव्यांतील दोषाचें जसें प्रदर्शन करून दिलें त्याप्रमाणें गुणाबद्दल ही दोन शद्ब लिहिणें इष्ट आहे. हल्लीं महाराष्ट्र भाषेचे अभिवृध्द्यर्थ तिचे हितचिंतकाकडून ग्रंथरूपानें जे कांहीं प्रयत्न चालूं आहेत त्यांतील प्रयत्नाचा कांहीं अंश रा. शेवडे यांनीं यथाशक्ति प्रस्तुत पुस्तकाचें प्रकाशन रूपानें उचलून त्यांनीं महाराष्ट्र भाषेंतील ग्रंथकाराचे मालिकेंत स्वतःस गोंवून घेतलें या त्यांचें स्तुत्य उद्योगाबद्दल त्यांची तारीफ करणें अयोग्य होईल असें नाहीं. नेटानें प्रयत्न करणारास केव्हांही यश आल्या शिवाय राहात नाहीं. असो. आतां प्रस्तुत चरित्र वाचीत असतांना मधून मधून जीं कांहीं दहा पांच पद्यें आह्मास चांगलीं अशीं वाटलीं त्यांतील कांहीं पद्यांचा खालीं निर्देश करून हें बराच लांबत चाललेलें चऱ्हाट आखडतें घेतों व आपले भरत खंडांतील परम पूज्य अशा अहल्याबाई सारख्या अमोलिक रत्नाची लोकांस रा. शेवडे यांनीं ग्रंथरूपानें तरी जागृति करून दिली या त्यांचे स्तुत्य प्रयत्न बद्दल व आमचे परममित्र रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांनीं प्रस्तुत काव्य आह्माकडेस परीक्षणा दाखल पाठविल्या बद्दल त्यांचे आभार मानून वाचकांची येथें रजा घेतों.

जिनें चढविलें पदा परम सुंदरा इंदुरा ।
सुनाम जपतां जिचें तुटति संसृती वागुरा ॥
जिचा झळकतो जगीं धवल पुण्य कीर्ति ध्वज ।
नमस्कृतिस पात्र हो सतत ती अहल्या मज॥ १॥
शहाणपण सत्यता, मनिं दयालुता, धीरता ।
वहिः परम उग्रता अनलसत्व गंभीरता ॥
मुखीं मधुरता क्रियीं निरपवाद निष्पक्षता ।
नृपीं गुण अवश्य हे सकलवर्य ती दक्षता॥ १ ! ४
पतीसह करावया गमन निश्चयातें धरी ।
अलौकिक तिची पतीवरि अनन्य भक्ती खरी ॥
विचार अविचार हा जन अहो ह्मणाही कसें ।
जिथें प्रियपणा अती वसतसे तिथें हें
असें ॥ १६१.

# वऱ्हाडसमाचार

मिती अधीक अश्विन शुद्ध ११ शके १८२०

निजाम सरकारानें राज्यव्यवस्थेच नियम नवीन केले आहेत आणि त्यांत मुख्य दिवाण, मंत्रीमंडळ व इतर अधिकारी यांच्या कामाला मर्यादा घालून दिल्या आहेत. हैदराबाद संस्थान इंडियांत पहिल्या प्रतीचें आहे. तेथील कारभार चांगला सुरळीत चालेल तर ती गोष्ट नेटीव अंमलाला भूषणास्पद होईल. नव्या नियमांत निजाम सरकारनीं खुद्द आपल्या अधिकाराला पुष्कळ मर्यादा घालून घेतल्या आहेत. ही सुधारणा खरोखर वाखाणण्यां सारखी आहे. हैदराबाद दरबारांतली बेबंदशाही पुष्कळशी नाहींशी होईल व अव्यवस्था यापुढें दृष्टीस पडणार नाहीं असा क्रम नव्या नियमांनीं घालून दिला आहे. मुख्य बाब उत्पन्नाची व खर्चाची होय. तिजविषयीं विशेष दक्षेतेची देखरेख चालविली आहे. पैसा गैरविल्हेनें खर्चला जाऊं नये ह्मणून अतिशय काळजी घेतली असून सर्व अष्टाधिकार व जबाबदारी हीं दिवाण साहेबाकडे सोंपविलीं आहेत. ते इंडिया सरकाराशीं व अलिशान रेसिडेंटाशी पत्रव्यवहार चालवून सर्व राजकीय गोष्टी नीटपणें संभाळतील. दिवाण नबाब विकार उल उमराव बहादूर हे नवीन नियम उत्तम प्रकारें अंमलांत आणतील अशी आह्मास उमेद आहे. निजाम सरकारावर प्रजाजनांचें प्रेम अतिशय आहे आणि ह्मणूनच त्यांच्या वाढदिवसा निमित्त थोडे दिवसा पूर्वीं जो महोत्सव झाला त्यांत सर्वांची राजभक्ती अनेक तऱ्हांनीं दृष्टीस पडली. नवीन नियमा मध्यें लोकप्रतिनिधी मंत्रिमंडळामध्यें घेण्याविषयीं कांहीं योजना नाहीं आणि वर्तमान कालाला अनुसरून ही सुधारणा अवश्य पाहिजे आहे. असा प्रत्यक्ष नियम नाहीं तथापि लोकप्रतिनिधींस कौंसिलदारी देण्याला आमचे निजाम सरकार चुकणार नाहींत अशी आह्मास उमेद आहे. ही सुधारणा श्रीमंत होळकर सरकार यांनीं लक्षात घेण्या सारखी आहे. त्यांच्या दरबाराची स्थिति ऐकीव गोष्टीवरून समाधानकारक आहे असें कोणी ह्मणणार नाहीं. सध्यांच्या कालाचा ओघ पाहून श्रीमंत होळकर सरकार कांहीं अव्यवस्था नाहींशा करितील तर सर्व राष्ट्रावर मोठे उपकार होतील.

कर्जबाजारीपणानें शेतकरी, जहागिरदार, इनामदार इत्यादि मंडळी रसातळास पोंचत चालली आहे. जमीन जुमला मूळच्या मालकाच्या ताब्यांतून सावकाराच्या घरीं जात चालला आहे ही गोष्ट मोठी अनिष्टकारक होय. हें अरिष्ट आमच्या प्रांताला देखील अतिशय भोंवलें आहे. आमचे शेतकरी ह्मणजे मूळचे जमिनीचे मालक हे कालचक्राच्या फेऱ्याखालीं चुरडून गेले आहेत. ते निव्वळ शेतींत काबाडकष्ट करणारे मजूरदार बनत चालले आहेत. ही स्थिती कांहीं वर्षें पर्यंत वाढत जाईल तर मोठा भयंकर परिणाम होईल. दास्यत्वांत झिजतां झिजतां हा शेतकरी लोकांचा वर्ग नष्टप्राय होण्याचा संभव आहे. हल्लीं सावकारीला व वकिलीला ऊत आलेला आहे आणि या दोन धंद्याला सरकारी न्यायकोर्टाची मदतही मोठी भक्कम आहे. या तिन्ही गोष्टी संकलित होऊन आमच्या वऱ्हाड प्रांतालाच काय पण सर्व राष्ट्राला उतरता पाया लागला आहे. या बाबदींत नवा कायदा करण्याविषयीं सरकारचा विचार पुष्कळ वर्षां पासून चालूं आहे परंतु त्या संबंधानें कांहींच योजना होत नाहीं. शेतकऱ्यांची आणि मुख्यत्वें करून जहागिरदारांची शेती सावकारांच्या ताब्यांत जाऊं नये ह्मणून काठेवाड व सेंट्रल इंडियांतील कांहीं संस्थानिकांनीं एक नियम असा केला आहे कीं सावकारांनीं जमीनदाराला कर्ज अशा बेतानें द्यावें कीं जमीनदार मेला कीं सावकाराच्या कर्जाचा बोजा जमिनीवर कांहीं राहणार नाहीं जमीनदाराला सर्व इस्टेट विकण्या इतकें किंवा आपल्या आयुष्या पेक्षां अधीक मुदतीपर्यंत बोजा ठेवण्या इतकें कर्ज काढतां येणार नाहीं असा नियम केल्यापासून प्रत्येक मनुष्याच्या कृतीनें त्याच्या भावी पिढीला कर्जबाजारीपणाचा त्रास होणार नाहीं. कर्ज काढण्याची मनाई अशा अप्रत्यक्ष रीतीनें झाल्यामुळें सावकारीच्या मूळावरच कुठाराचा आघात पडण्या सारखें होणार आहे. असला नियम शेवटीं लाभकारकच होईल असें आमच्यानें सांगवत नाहीं परंतु या नियमाचा अनुभव घेऊन पाहण्या इतका हा चांगला आहे, आणि सावकारा पासून रयतेचा बचाव करण्याला अन्य उत्तम उपाय आढळत नाहीं तोंपर्यंत हा नियम चांगलाच ठरेल असा आमचा समज आहे. आमचे प्रांतिक सरकार कर्ज काढण्याच्या अधिकाराला मर्यादा घालण्याच्या तत्वावर कांहीं नियमन करील तर प्रजासमूहावर मोठे उपकार होतील. शेतकऱ्याचा रिलीफ आक्टही या प्रांताला लागूं करण्या इतकी निकृष्ट स्थिती प्राप्त झाली आहे असा आमचा ग्रह आहे. रोग बलवत्तर होऊन दुःसाध्य होण्यापूर्वीं औषधोपचार होणें फार अगत्याचें आहे.

पुण्यास ' काळ ' नांवाचें एक सप्ताहिक पत्र मराठींत गेल्या पांच महिन्या पासून निघूं लागलें आहे. आमचे मित्र रा. रा. शिवराम महादेव परांजपे एम. ए. हे या पत्राचे संपादक आहेत. यांतील लेख मोठे भारदस्तपणाचे व निस्पृहतेचे असून अगदीं गोड व सरळ भाषेंत लिहिलेले असतात. या पत्रांतील लेखाच्या ओघावरून या पत्रकर्त्याचा पंथ निराळाच दिसतो. इंग्रजींत अशा पंथाला Socialist ' सोशिआलिस्ट ,' पंथ असें ह्मणतात. ' राज्य कशानें मोडकळीला येतें, या सदरा खालील लेख व मुख्यत्वेंकरून गेल्या ९ सप्टेंबरच्या अकांत ' खालचे लोक चुरडले जातात ते असे ' या माथळ्या खालील विषय प्रतिपादन हीं त्यांचा पंथ चांगला व्यक्त करितात. सरकार दरबारीं ज्यांचा काळ चालता आहे असे मधले लोक तोंडपुजेपणा व हांजी हांजी करून खालच्या प्रतीच्या लोकांस घरभेदेपणानें व फितुरीनें कसे बुडवितात हें दाखवितांना आमच्या मतें आमचे मित्र फार घसरले आहेत. सामाजिक रचना वाईट आहे असें ह्मणण्यांत अर्थ नसतो. समाजाची सुधारणा उपलब्ध साधनांनीं जसजशी होणारी असेल तसतशी करण्याकडे त्यांच्या लेखांचा ओघ बदलेल तर आह्मास

विशेष आनंद होईल. राजश्री परांजप यांनीं दाखविलेले दोष लोकांनीं ध्यानांत धरण्या सारखे आहेत तथापि समाजांतील विषमता अगदींच मोडून टाकूं पाहणाऱ्यांवरही चुकीचा प्रयत्न केल्याचा दोष येतो. सोशिआलिस्ट पंथाचीं उत्तम उत्तम तत्वें आमचे मित्र जगाच्या दृष्टीस चांगलीं आणतील असें आह्मी इच्छितों.

देशावरून मीठ आणून जसें कोंकणांत विकतें तसा प्रकार कधीं कधीं वर्तमानपत्रांतील बातम्या संबंधानें होतो. वऱ्हाड प्रांतांतील बातमी मुंबईच्या दैनिक 'गुराखी' पत्रकर्त्यांनीं प्रसिद्ध केली आहे आणि ती आह्मी आपल्या वाचकास सादर करणार आहों. बातमी राजद्रोहा संबंधानें आहे ह्मणून मोठ्या भयभीत पणानें व साशंकवृत्तीनें आह्मी ती प्रसिद्ध करित आहों. 'गुराखी' कार गेल्या २१ तारखेच्या अंकांत लिहितात कीं "उमरावती येथून जी एक बातमी आली आहे तीवरून १२४ अ. कलमाचा दवरा लवकरच ह्या वऱ्हाड प्रांताच्या पूर्व राजधानीचे शहरांत सुरूं होईल असा रंग दिसूं लागला आहे. कारण गणपतीच्या मेळ्यांत एक दोघां व्यक्तींचीं जीं संभाषणें झालीं तीं राजद्रोहात्मक असल्या वरून तिकडील अधिकारी संभाषणकारांवर १२४ अ. कलमाचा कोरड उडविणार असल्याचें कळतें."

मुंबईच्या पत्रकारांनीं बातमी वरून कळतें इत्यादि विकल्पदर्शक पुष्कळ शब्द घातले आहेत. आह्मांस या बातमीला तर कांहींच आधार दिसत नाहीं. असल्या निराधार बातम्याला 'गुराखी' कर्ते मुख्य स्थळ देतात ही गोष्ट ठीक नाहीं. राजद्रोहाच्या संबंधाची कोणतीही बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी पत्रकर्त्यांनीं फार कसोशीनें तपास केला पाहिजे. अगोदरच राजश्री टिळकांच्या प्रकरणा पासून राजद्रोहाच्या कलमाचा दरारा फार बसला आहे. लोकांच्या चित्तवृत्ती विनाकारण क्षुब्ध न होतील. अशा विषयीं विशेष खबरदारी घेण्यांत येईल तर आह्मी 'गुराखी' कारांचे फार आभारी होऊं. आमचा प्रांत अस्सल सुधारलेल्या इंग्रजी अंमला खालीं नाहीं. तथापि राजद्रोहाच्या खोट्या शंका आमच्या स्थानिक सरकारास आजपर्यंत कधींच आल्या नाहींत. गेल्या गणपतीच्या मेळ्यांत उमरावतीस कोणी राजद्रोहाचीं भाषणें केलीं आहेत असें आमच्या ऐकण्यांत देखील नाहीं. किंवा एखादा वेडा पीर कांहीं बडबडला असला असें गृहीत धरलें तरी ढेंकणावर तलवार गाजविण्याची बहादुरी आमच्या प्रांतिक सरकाराला नको आहे. राजश्री टिळकांच्या खटल्या पासून पुण्याच्या बाजूकडील प्रांतस्थ लोकां विषयीं कांहीं आंग्लो-इंडियन शहाण्याचे कांदे नाना कुतर्क घेतात तथापि विशेष असमाधान वाटण्याचें कारण आमच्या नजरेला कधींच आलें नाहीं. आमचें स्थानिक सरकारचें डोकें बिघडलेलें नाहीं आणि तें बिघडण्याचा संभवही नाहीं ह्या अर्थीं आह्मी सर्वत्रास पक्कें आश्वासन देतों कीं, मि० हेअर सारखे जुने सरदार कमिशनरच्या जागीं विद्यमान असतांना राजद्रोहाच्या कायद्याच्या लढाया आमच्या प्रांतांत होणार नाहींत.

## उदार देणगी.

कैलासवासी सरदार दयाळसिंग हे पंजाबांत अति जुनाट व प्रसिद्ध घराण्यांतील असून अत्यंत लोकप्रिय होते हें सर्वांस महशूर आहे. लोकप्रियता कांहीं सोपी गोष्ट नाहीं. थोर लोकांच्या गोष्टी चिरकाल चालण्या सारख्या संस्था असल्या ह्मणजे त्यांच्या सत्कृतीचा लाभ परंपरा मिळत जातो व पिढ्यानुपिढ्या त्या उदारचरित पुरुषांचें उदाहरण अनुकरणासाठीं लोकांच्या डोळ्यापुढें खेळतें राहतें.

कै० सरदार दयाळसिंग यांचा छापखाना चांगल्या स्थितींत असून तेथें पंजाबांतील लोकमान्य वर्तमानपत्र ट्रिब्युन निघत असतें. हा कारखाना सतत चांगला चालेल अशा विषयीं योजना पक्की केली असून त्याची व्यवस्था कांहीं गृहस्थांच्या कमिटीकडे सोंपविली आहे. सरदार दयाळसिंग यांनीं आपल्या मृत्युपत्रांत १५ लक्ष रुपयांची देणगी निराळी काढली आहे आणि त्यांची आज्ञा आहे कीं त्या पैशाचा उपयोग एक स्वतंत्र कालेज संस्थापित करण्याकडे व्हावा. या कालेजांत ईश्वरविषयक गोष्टीही शिकविण्यांत येतील. तिसरी चिरस्मरणीय गोष्ट ह्मणजे एक वाचनालय स्थापण्याचा संकल्प त्या गृहस्थानें आपल्या वारसाकडे सोंपविला आहे. या कार्यासाठीं ६० हजार रुपये निराळे दिले आहेत. या वाचनालयाचा उपयोग सर्व लोकांस फुकट करूं द्यावा असा त्यांनीं आपला मनोदय मृत्युपत्रांत कळविला आहे. श्रीमंती किंवा धनदौलत अशा उदार सत्पुरुषाला मिळते तेव्हांच तिचें खरें वैभव लोकदृष्टीला येते.

'अमृत बझार पत्रिका' कर्त्यांनीं एक उत्तम संवाद प्रसिद्ध केला आहे. याच्या सत्यतेबद्दल त्या पत्रकर्त्यांची बरोबर खात्री झालेली नाहीं तथापि त्या पासून पुष्कळ गोष्टी घेण्या सारख्या आहेत. हा संवाद लार्ड हामिल्टन व नामदार कर्झन यांच्या मध्यें एका नेमणुकी संबंधानें झाला. बोलतां बोलतां लार्ड हामिल्टन ह्मणाले कीं मी वयोवृद्ध आहे आणि स्टेट सेक्रेटरी ह्मणून माझा अनुभवही पुष्कळ आहे. नामदार कर्झन उत्तर देतात कीं वयोवृद्धपणा हा नेहमीं गुणच आहे असें ह्मणतां येत नाहीं. लार्ड हामिल्टन यांनीं ना० कर्झन यांस इंडिया संबंधानें थोडी धमक व तरतरी कमी करण्यास सांगितलें व आपणाला न विचारतां निराळी दिशा न काढावी ह्मणून व आपला हुकूम पाळीत जावा ह्मणून मोठ्या मिन्नतवारीनें सांगितलें. परंतु नामदार कर्झन यांनीं साफ उत्तर दिलें कीं नाथिअल कर्झन हा कांहीं सांगकाम्या प्रमाणें दुसऱ्याच्या तोंडानें पाणी पिणारा नाहीं व हुकूमाचा बंदा गुलाम होऊन आपलेपणा नष्ट करणारा ही नाहीं. पूर्वींचे व्हाइसराय स्टेट सेक्रेटरीच्या हातांत बाहुली प्रमाणें नाचत असतील तर मी तसा 'जी हुजूर' असें ह्मणणारा नाहीं. तुमच्या चुक्या दिसल्या तर त्यांच्या मी चिंध्या चिंध्या उडवीन. शेवटीं लार्ड हामिल्टन यांनीं उद्गार काढला कीं ना. कर्झन यांची नेमणूक झाली ही मोठी चूक होय. हल्लीं इंडियाला खऱ्या हिंमतबहादर व्हाइसरायाचीच जरूर आहे आणि नाम. कर्झन कळसूत्रा प्रमाणें स्टेट सेक्रेटरीच्या हातांत खरोखरच न खेळतील तर इंडियाचें सुदैव उदयास येत आहे असें होईल.

## The Berar Samachar

MONDAY, SEPTEMBER 26 1898

We have grave reasons to suspect the attitude of the local government towards the educational department. The government are indifferent, apathetic and unsympathetic; and the requirements and aspirations of the people are being pushed aside with a sort of disdainful attitude. Education has never been under the benign patronage of the government as it ought to have been in comparison with the scale of expenditure towards education in the countries of Europe. We do not wish to minimize the excellent blessings of education that we have had the good fortune to receive under the kind and benevoient British rule. The British rule is triumphant because its glories are centralized in the literal policy of educating the people. The film of ignorance is taken away and the natural result is a healthy wakefulness to aspirations of a national life. But, with all this the Government fail in their duty when they stop short the progress of education. The Indian people cannot cope with the western nations because their limited education cannot keep pace with the marvelons development of sciences and arts in modern times.

The educational department should be the most important machinery of administration. It should be the life and soul of the whole administration. But it is given the last insignificant rank in the imprudent arrangements of the Anglo—Indian Government. The educational department is maintained to the starvation—point. The present famine—rations are just enough to keep erect the whole frame of education. The Government does not spend enough on education. It is the worst miser and ill consults its own safety and stability when it quietly allows at work fatal causes to undermine the material prosperity of India. The higher education, even though it is imparted on a stingy scale, is hardly useful unless it is coupled with technical and industrial education. The higher education is as much necessary as the technical and industrial one. In fact, for the survival of India in the race with western nations, both must go hand in hand. One can scarcely live without the other. The *literary* education is as much the back—bone of the techinical and industrial education as the latter is of the former. Both must converge and flourish to produce the golden effect of giving India the national life of maintaining its own footing. We heartily welcomed the motion of Sir M. Bhownagaree because he brought to light the bad need of the nation.

But this want of technical edu—cation is felt the more when we preceive that the Government intend to cut down expediture on the educotion that is imparted at present. This idea alarms us in the extreme when we see the great danger that is looming in the present proposal. If primary education is not to progress along with the times, if middle schools are to close the exclusive services of an efficient Educational Inspector and if the Director is to be forced to curtail expenditure even by the closing of a High school we do not really see whether the Government are alive to their duty towards the people and can really promote ends of a good administration. Such a policy shows that the Government are blunt to the bitings of conscience. Duty is the highest monitor and if the government shut their eyes to its call we must say that a bad day is in store for us. We call this policy a sheer act of false economy. False economy is even worse than prodigality. A spend—thrift does not kill the nicer feelings of heart whereas the government have lost all scruples. The main policy of repression must be changed and economy must be pursued on lines of solid prudence and statesmanship. We hope that the government will think twice before they commit themselves to a suicidal policy of false economy.

## वऱ्हाड

हवामान— पाऊस नाहीं ह्मणून मोठी चिंता आहे. खरिपाचीं पिकें साधारणपणें येतील पण रब्बीला धोका बसेल व पाण्याचा दुष्काळ पडेल. काल दोन प्रहरीं पाऊस थोडा वेळ पण जोराचा पडला ही ईशकृपेचीच खूण होय. रोगराई नाहीं.

रा० रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर, आफि० एक्स्ट्रा असि. कमिशनर, वाशिम यांस माजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार देण्यांत आले.

मि. जे. आर. एडवर्डस एक्स्ट्रा असि. कमिशनर बुलढाणा यांस माजिस्ट्रेट वर्ग १ चे अधिकार दिले.

चिखलीच्या डिसपेन्सरी कमिटींत खालील गृहस्थांस सभासद नेमलें आहे.:—

रा० रा०

लक्ष्मण आप्पा बापू आप्पा,
रामप्रताप रामनारायण.
बळवंत रामचंद्र.

गेल्या जुलै महिन्यांत वऱ्हाड प्रांतांत ६०३१ मनुष्यें जन्मलीं व ३९१३ मरण पावलीं. गेल्या सालीं याच महिन्यांत १३१८८ माणसें मरण पावलीं. हा महिना इतका नामी पूर्वीं कधीं गेला नव्हता. नाहीं तर जुलै महिन्यांत दर वर्षीं अनेक रोग उद्भवत असतात.

वऱ्हाडचें 'ला जर्नल' सुरूं झाल्या नंतर दोन वर्षांच्या आंत तें बंद पडल्या सारखेंच होतें परंतु आनंदाची गोष्ट कीं १८९७ सालच्या एप्रिल पासून आगष्ट पर्यंत एकंदर पांच महिन्यांचा एक ६० पृष्ठांचा समग्र अंक या आठवड्यांत प्रसिद्ध झाला आहे.

## पाहिजे.

एक नऊ इयत्ता पास झालेला मनुष्य जिनिंग फ्याक्टरी मध्यें क्लार्कांचें काम करण्यास पाहिजे आहे. पगार दरमहा १० रुपये मिळेल. काम पसंत पडल्यास १२ महिन्या नंतर १२ रुपये पगार केला जाईल. चांगल्या वर्तणुकी बद्दल दाखला आणिला पाहिजे. कळावें.

मलकापूर. २४।९।९८ } विष्णुसा बाळकृष्णसा साहू.

## वर्तमानसार

दुष्काळाचें भविष्य.—रशिया देशांत ह्या वर्षी फार भयंकर दुष्काळ पडणार असल्याबद्दल तिकडील पत्रकर्त्यांनीं भविष्यें केलीं आहेत. कारण, तिकडे पिकांस पाहिजे तसा; वेळेवर पाऊस न पडल्यामुळे आतां पुढें पीक होण्याची आशा नाहीं.

कागदी तोफा!—जर्मनीचे प्रसिद्ध तोफा करणारे मि. क्रप यांनीं आपल्या कारखान्यांत कागदाच्या तोफा बनवल्या असून त्या दुसऱ्या पोलादि तोफाप्रमाणें काम करितात तथापि पोलादी तोफांच्या जागीं ह्या कागदी तोफांचा उपयोग करण्यांत येणार नाहीं. मात्र, ज्या डोंगरी वगैरे अडचणीच्या जागीं रणमैदानांतील तोफखाना नेतां येणें अशक्य असेल अशा ठिकाणीं ह्या कागदी तोफा नेऊन काम करण्याला फार उपयोगी पडणाऱ्या आहेत. आणि त्यासाठींच त्या; मुद्दाम तयार करण्यांत आल्या आहेत.

समुद्रावरून चालणें.—अमेरिकेंतील एका कुशल नावाड्यानें समुद्रावरून चालत जाण्याची एक नवीन योजना केली असून त्या योजनेनें तो अटलांटिक महासागर ओलांडून इंग्लंडास जाण्याकरितां इतक्यांतच निघणार आहे. ह्यानें एक प्रकारचा नौकाकृति जोडा तयार केला असून तो पायांत घातला ह्मणजे आचेवर त्याच्या शरीराचा सर्व भार तोलला जाऊन तो बर्फाच्या गुळगुळींत जमिनीवर जसें चालत जावें त्याप्रमाणें, समुद्राचे' सपाटीवर खुशाल चालत जातो! ह्याचे बरोबर नुकताच एकाकी पृथ्वीप्रदक्षिणा करून गेलेला साहसी दर्यावर्दी क्याप्टन अंड्रयू हाही समुद्रावरून चालत जाणार आहे. ज्ञा. च.

थोडे दिवसांपूर्वी बंगाल्यांत भयंकर वादळ होऊन जलप्रय झाला व असंख्य खेडीं पाण्यांत बुडून जाऊन पुष्कळ प्राणहानि झाली व पिकाचा नाश झाला. तसेंच वेस्टइंडियन बेटांतही भयंकर वादळ होऊन ४१९ शेंवर प्राणहानि झाली. सेंट व्हिन्सेन्ट बेटांतील राजधानीचें शहर किंग्जटौन, हें तर अगदीं जमीनदोस्त झालें आहे. ह्या वादळानें एकंदर ९०००।९२००० लोक उघडे पडले आहेत. ह्या वादळानें तिकडचें उसाचें पीक अजीबात नाहींसें झालें.

ऑ. बाबू आनंदमोहन बोस कलकत्यास गेले तेव्हां त्यांच्यापुढें मशाली व निशाणें घेऊन लोकांनीं त्यांची मिरवणूक काढली. त्यांचे मागें एका ओळीस पांच याप्रमाणें गाड्या लागून राहिल्या होत्या, त्यांनीं एक मैल रस्ता भरून गेला होता.

सर सालरजंग, यांची नात सुमारें १६ वर्षांची होती ती हैदराबादेस मृत्यु पावली आतां त्यांच्या वंशांत एकच मुलगा उरला आहे, तोही अशक्तच आहे. ईश्वर त्यास दीर्घायु करो!

वायव्य सरहद्दीवरील महमूद जातीच्या लुटारूंनीं कांहीं लोकांना जखमी करून आणखी कांहींना पन्नास गुरें व शेंभर मेंढ्यांसकट पळवून नेलें. पळवून नेलेल्या माणसांचा अजून पत्ता नाहीं! ह्या चोरट्यांमध्यें कांहीं वझिरी लोक होते ह्मणतात.

फिलीपाईन बेटांत स्वतंत्र प्रजासत्तात्मक राज्य स्थापण्याचा तेथील दंगेखोरांचा यत्न चालू आहे ह्मणून युनायटेड स्टेट्सनीं तिकडे आरमार पाठविलें आहे.

दक्षिण फ्रान्समध्यें वीज पडून रानास आग लागली. ह्या आगीनें एकंदर तीस मैल लांब व सात मैल रुंद एवढ्या प्रदेशांतील सर्व खेडीं, शेतें, झाडें वगैरे फस्त केलीं सु०

खैबर घांटाचा बंदोबस्त करण्याचें काम हिंदुस्थानसरकारच पंजाब सरकारापासून आपलेकडे घेणार असून त्या घांटाचे तोंडाशीं एक मोठा किल्ला बांधणार आहे. आणखी त्यावर आफ्रीडी लष्करी लोकांची ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हाताखालीं शिबंदी ठेवणार.

हिंदुस्थानसरकारनें सध्यां ब्रिटनचा व जपानचा जो नवा व्यापारी तह झालेला आहे त्याचा फायदा हिंदुस्थानचे लोकांनाही जरूर मिळवून घेण्याची मोठी खटपट मनापासून चालविली आहे.

लखनौ येथें भांडीं वगैरे धातूंच्या निरनिराळ्या लोकोपयोगाच्या वस्तू तयार करण्याचा कारखाना एक लक्ष रुपये भांडवल जमवून हुन्नरी, हिंमती व भांडवलवाले लोक एक कंपनी उभारून लवकरच काढणार आहेत.

ट्रान्सवॉल येथें बराच घोटाळा होण्याचा संभव दिसत असल्या कारणानें तेथें हवें तेव्हां जोरदार हिंदी व ब्रिटिश सैन्य पाठवितां यावें ह्मणून त्याची तयारी ब्रिटिश सरकार मॉरिशस येथें जोराची करून ठेवीत आहे. शु० मू०

निझामाच्या कंटिंजंट फौजेची शिकंदरा येथें लटकी लढाई व्हावयाची आहे.

महाराणी साहेबांनीं आपला एक फोटोग्राफ हैद्राबादच्या २ ऱ्या पलटणीचे कमांडर मीर हशीम अली बहादूर यांस बक्षीस ह्मणून पाठविला आहे.

मसुरी डेकन नांवाचें वर्तमानपत्र छापून प्रसिद्ध करण्याची निझामाच्या दिवाणानें मनाई केली.

दरोडखोर जेव्हां हत्यार घेऊन पोलिसच्या वाटेंत जाऊं लागतील तेव्हां त्या दरोडखोरांवर आपलें हत्यार चालूं करण्याचा व त्यांच्यावर गोळ्या घालण्याचा पोलिसास अधिकार आहे असें सरकारानें नुकतेंच ठरवून टाकलें आहे. सरकारचें हें ठरविणें अगदीं रास्त आहे, पण दरोडखोर दरोडे घालण्यास कां प्रवर्तक होतात याचा तपास करण्याच्या मागें लागणेंही अवश्य आहे.

इजिप्तचा प्रसिद्ध आरबी पाशा हल्लीं सीलोन येथें नजर कैदेंत आहे. आपला मुलगा इब्राइम बेग यांचें लग्न निझामाचे कस्टम कामदार नबाब इमाद यांच्या घराण्यांत होत असल्यामुळें त्यांस तुमच्या राज्यांत लायक अशी एक नोकरी द्या असें आरबी यानें निझामांजवळ मागणें केलें. त्यांस देण्यासारखी नोकरी आपल्याजवळ शिल्लक नाहीं असा निझामानें जबाब दिला. एकाद्या साहेबाची शिफारस झाली असती तर लागलीच अमलांत आली असती.

१८९६ च्या अगष्ट अखेर हिंदुस्थान सरकारच्या खजिन्यांत १४,२१,१०,००० रुपये शिल्लक होती, १८९७ च्या अखेर ८९०४३००० होती व गेल्या अगष्ट अखेर १४,३७,१९,००० होती.

उत्तर हिंदुस्थानांतून एका माणसानें अफूचे दोन डबे भरून त्याची बंगी करून बंगींत बुकें आहेत असें सांगून कोचीनच्या राज्यांतल्या एका माणसाच्या पत्यावर रवाना केली. उघडकीस आल्यावर तपास चालू झाला आहे.

कानेडियन रेल्वेनें गव्हांचा मोठा साठा करण्यासाठीं नुकतीच एक इतकी मोठी वखार तयार केली आहे कीं तींत ३०,००,००० बुशेल गहूं राहाण्याची सोय केली आहे. १०००००० बुशेल गहूं राहण्याजोगी जुनी एक वखार आहेच.

एका इटालियन माणसानें आस्ट्रियाच्या राणीचा खून केला. खुनी ह्मणून २।४ माणसें पकडलीं आहेत.

आफ्रिकेंतील फाशोडा ठिकाण फ्रेंचांनीं बळकावलें असें सांगतात.

क्रीट बेटांत कांडिया येथील लोकांनीं पुन्हा आग भडकली. नवे २५० लष्करी लोक बंदरांत आले पण शहरांत शिरण्यास असमर्थ आहेत. इतर राजांनींही फौज आणावी अशी सूचना झाली व त्याप्रमाणें इटालीनें रवानाही केली. हत्यारी ख्रिस्ती लोकांनीं शहरास गराडा घातला. १५,७०० वशी लोकांस घालवून देवून टर्कीनें आपल्या फौजेस परत बोलवावें अशी सूचना झाली. या कांडियाच्या दंग्यांत ६०० ख्रिस्ती लोकांचा फडशा झाला. ४८ तासांत सगळ्या मुसलमानांस निःशस्त्र करा, ख्रिस्ती लोकांवर हल्ला करणाऱ्या प्रमुखांस आमच्या स्वाधीन करा आणि इंग्रज लोक राहात असलेले किल्ले आमच्या स्वाधीन करा अशी इंग्रज अधिकाऱ्यानें तेथील टर्कीच्या गव्हरनरास शेवटची नोटिस दिली.

रशियाची लढाऊ गलबतें काळ्या समुद्रांत जमूं लागलीं असें सांगतात.

चीन व जपान यांच्या दरम्यान एकाचा शत्रू तो दुसऱ्याचा शत्रु व एकाचा मित्र तो दुसऱ्याचा मित्र असा एक तह होण्याचें घाटत आहे असें सांगतात.

कांडियाच्या दंग्यातले पुढारी असे ४३ मुसलमान इंग्रजांच्या स्वाधीन केले.

फाशोडा प्रकरणांत जफरफ येथील फौजेचा फ्रेंचांनीं पराभव करून शत्रूचे १,००० ठार केले.

चीन व बर्मा यांची सरहद्द कायम करण्याचें काम येत्या डिसेंबरांत सुरू होणार आहे. अ०

जपानी लोकांच्या ह्मणी.

कितीही जरी कडक ऊन लागलें तरी वाईट झाडाखालीं बसून विसांवा घेऊं नका.

सच्छील मनुष्य कितीही जरी तान्हेला असला तरी दुष्टाच्या झऱ्यावर तो कधींही पाणी पिणार नाहीं.

मनुष्य संकटाच्या तडाक्यांत सांपडला ह्मणजे मग परमेश्वराचा धांवा करितो. तोपर्यंत त्याच्या अस्तित्वाबद्दल वादविवाद करीत असतो.

प्रेमासारखें गूढ दुसरें कशांत नाहीं. प्रणयी मनुष्यास वाईटाचें चांगलें व चांगल्याचें वाईट दिसतें.

लोकांचा मागून आणून घातलेला कपडा अंगाला कधींच बरोबर बसत नाहीं.

स्वतःला चिमटा घे ह्मणजे दुसऱ्याचें दुःख तुला कळून येईल.

बारीकसारीक गोष्टीकडे लक्ष्य देणें हीच घरांतली काटकसर होय.

राजा असो रंक असो, घड्याळाच्या कांट्याप्रमाणें दैवगति सगळ्यांची फिरते.

सगळीं औषधें जाहिरातीप्रमाणें गुण देतात असें मुळींच नाहीं. जाहिरात विक्रीसाठीं आहे; गुणासाठीं मुळींच नव्हे.

जो जलद शिकतो तो जलद विसरतो. ज्या नदीचें पाणी लौकर चढतें तिचें पाणी लौकर ओसरतें.

एकदां एक कुत्रा भोंकायला लागला ह्मणजे आळींतील, नव्हे सगळ्या गांवांतील कुत्रीं सुद्धां त्या या बरोबर मोठमोठ्यानें भोंकूं लागतात.

कोणतेही एखादें कृत्य होऊन गेलें ह्मणजे त्याबद्दल युक्त्या व शकला मागून काढीत बसण्याची व पाठीमागून आपल्या बुद्धिबळाचे डाव टाकीत बसण्याची मूर्ख लोकांना फार संवय असते.

दुसऱ्यावर तोंड टाकून बोलण्याची संवय फार वाईट. कारण तसें तोंड ह्मणजे अपकीर्तीचे ढोल होय.

गांवांत कीर्ति होण्याला फार काळ लागतो; पण अपकीर्ति हां हां ह्मणतां गांव ओलांडून सुद्धां जाते.

साऱ्या युरोपांत १५३० नाटकगृहें आहेत. इटलींत ही दुसऱ्या देशांपेक्षां पुष्कळच जास्त आहेत.

एका लंडन शहरांत २४८ खानावळी आहेत. शिवाय उपहारगृहेंही आहेत.

सगळ्या जगांतल्या आगगाड्यांचा आठवड्याचा खर्च ११००००००० इतका पौंड आहे.

सगळ्या युरोपांत अतिवृद्ध राजा डेनमार्कचा आहे. त्याचें वय आजला ८९ वर्षांचें आहे ह्मणतात. त्याचें नांव दहावा ख्रिस्तियन.

सायकलवरून भरधांव जात असतां आपल्या मागें कोणी आहे कीं काय हें पाहण्या करितां सायकलच्या पुढच्या दांड्यावर एक आरसा लावण्याची युक्ति एका पाश्चात्य शिल्पज्ञानें नवीनच काढली आहे

बल्गेरियांत एखाद्यानें जर एखाद्या रोगावर रामबाण ह्मणून औषध शोधून काढून तो त्याचा लोकांत प्रसार करूं लागला आणि त्यापासून जर कोणास गुण आला नाहीं तर त्याच्यावर लायबल करितात.

लॅंकेशायरमधील सर्व गिरण्या मिळून जर रात्रंदिवस काम करतील तर अर्ध्या दिवसांत १५५०००००० इतके मैल लांब सूत त्या काढूं शकतील. क०

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.